MERC

# वार्षिक अहवाल २०१०-२०११



## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

जयति जयति सूर्या: सप्त लोकैक दीप:
किरणम् इति तथाप: सर्व दु:खस्य हर्ता।
अरुणकिरण गम्याश्चधीर आदित्यमूर्ति:
परम परम दिव्य: भास्कराष्टम नमामि।।



**Shri V. P. Raja**
Chairman



**Shri S. B. Kulkarni**
Member



**Shri V. L. Sonavane**
Member

## अनुक्रमणिका


अध्यक्षांचे मनोगत ........ १
आयोगाच्या बैठका ........ २
ताजिकिस्तान - किर्गिझस्तानच्या प्रतिनिधीमंडळाची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला भेट ३
नायजेरियन विद्युत नियामक आयोगाची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला भेट ........ ३
विद्युत क्षेत्रात क्षमता वाढविण्यासाठी पुढाकार ........ ३
वीज मागणी व्यवस्थापन ........ ४
नूतनशील ऊर्जा ........ ५
परवाना मंजूर करणे ........ ६
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ ........ ७
भार नियमन ........ ८
मुक्त प्रवेश ........ ९
वीज दराचे आदेश ........ १०
वीज खरेदी ........ १७
अन्य आदेश ........ १९
ग्राहक आधार आणि गाऱ्हाणे निवारण यंत्रणा ........ २२
विद्युत लोकपाल (इलेक्ट्रिसिटी ओम्बड्समन) ........ २२
परिशिष्ट १ - २०१०-११ मध्ये आयोगासमोर दाखल झालेल्या याचिका ........ २३
परिशिष्ट २ - २०१०-११ मध्ये आयोगाने पारित केलेले आदेश ........ ३७
परिशिष्ट ३ - ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षासाठी अलेखापरीक्षित आय-व्यय लेखा .. ४७

# अध्यक्षांचे मनोगत

विद्युत क्षेत्रात खुलेपणा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्त्व आणणे हे विद्युत अधिनियम, २००३ चे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातर्फे अथक प्रयत्न सुरू आहेत. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योगदान देणे ही सर्व संबंधितांची जबाबदारी असल्याची जाणीव अद्याप हवी तेवढी दृढमूल झालेली नाही. या प्रक्रियेत नियामकाची भूमिका संप्रेरकाची आहे. वीज निर्मिती, पारेषण, वितरण कंपन्या, वीज व्यापारी, विद्युत विनिमय व्यावसायिक आणि ग्राहक यांना परस्परांशी संवाद साधण्यासाठी समान व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि विद्युत अधिनियम, २००३ मधील सुधारणा प्रत्यक्षात आणणे ही कामे नियामक करीत असतो. याबाबतीत आयोगाने कोणतीही कसर सोडली नाही असे नमूद करताना मला आनंद होत आहे.

तथापि, आपल्या कामगिरीबद्दल समाधान असले तरी आयोग आपल्यावरील जबाबदारीबद्दल आणि सामान्य ग्राहकांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल सजग आहे. सर्व ग्राहकांना अखंड दर्जेदार वीज पुरवठा रास्त दरात झाला पाहिजे याबाबत आयोग ठाम आहे.

मुक्त प्रवेश, क्रॉस सबसिडी टप्प्याटप्प्याने कमी करत जाणे आणि समांतर परवाना हे आजही आयोगाच्या दृष्टीने चिंतेचे विषय आहेत. याबाबत काहीच प्रगती झाली नाही असे म्हणणे वस्तुस्थितीस धरून होणार नाही. मात्र या दिशेने अजून बरेच काम करायचे आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जोमदार आणि समन्वयाने कृती घडावी यासाठी आयोग प्रयत्नशील आहे. संबंधितांनी या प्रयत्नास साथ दिल्यास त्याची गती वाढेल.

या सामूहिक कृती योजनेचे मर्म म्हणजे मानसिकता बदलणे. विद्युत क्षेत्राच्या व्यवस्थापनात गेल्या दशकात खुलेपणा, सहभाग आणि पारदर्शकता याबाबत लक्षणीय परिवर्तन घडले आहे. विद्युत अधिनियमाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने विविध स्तरांवर अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. या प्रक्रियेत निर्माण होणारी नवनवी परिस्थिती भविष्याकडे नजर ठेवून हाताळायची आहे.

या वर्षी महाराष्ट्रातील विजेची उपलब्धता आधीच्या वर्षांपेक्षा समाधानकारक होती. उत्तम वृष्टी झाल्याने कोयना धरणातील पाण्याची पातळी गतवर्षापेक्षा चांगली आहे. याचा थेट लाभ सामान्य ग्राहकास होणार आहे. देशातील वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेत वाढ करण्याबाबत या वर्षभरात प्रशंसनीय प्रगती झाली आहे. आगामी पाच वर्षात क्षमता वाढीचे समोर ठेवण्यात आलेले महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सध्याचा वेग कायम राहिल्यास गाठता येईल. येत्या दशकभरात देशातील स्थापित निर्मिती क्षमता दुप्पट होण्याचे अनुमान आहे. निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक आणण्यात खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढणे खचित स्वागतार्ह आहे.

वीज क्षेत्रात सुधारणा आणण्यासाठी विद्युत अधिनियम, २००३ मध्ये आखून देण्यात आलेला मार्ग अवलंबणे हा राजमार्ग आहे. सुदैवाने या उद्दिष्ट प्राप्तीसाठी विविध राज्य सरकारे, केंद्र सरकार आणि नियामक यांनी स्वीकारलेला दृष्टीकोन समन्वयासाठी उपयुक्त ठरला आहे.

निर्णय प्रक्रियेत सल्ला–मसलतीला शक्य तेवढे अधिक स्थान देण्यासाठी सहभाग आणि संवाद याबाबतचे प्रयत्न आयोगाने २०१०–११ या वर्षात आणखी प्रखर केले आहेत.

संयुक्त प्रयत्नांची गरज असलेला आणखी एक मुद्दा म्हणजे वितरणातील तोटा कमी करणे. हा तोटा महाराष्ट्राच्या काही विभागांत पराकोटीचा आहे तर काही विभागांतील ग्राहकांची वर्तणूक वाखाणण्यासारखी आहे. प्रामाणिक ग्राहकांना विनाकारण भुर्दंड बसू नये याचा विचार आता होणे गरजेचे आहे. सतत वाढत्या वीज मागणीच्या संदर्भात महाराष्ट्रातील आणि मुंबईतील पारेषण यंत्रणा मजबूत करण्याचे आव्हान राज्यासमोर आहे. यादृष्टीने आयोगाने घेतलेल्या पुढाकारामुळे हालचाल सुरू झाली असली तरी अधिक प्रयत्नांची निकड आहे. पारेषण यंत्रणा सक्षम करण्यासाठी येणारे भांडवली गुंतवणुकीचे सर्व प्रस्ताव वेगाने तपासून राज्य पारेषण यंत्रणा योजना आणि मार्गदर्शक तत्वे यांना अनुसरुन मंजूर करण्यात येतील अशी आयोगाची भूमिका आहे.

महाराष्ट्रातील वीज क्षेत्रात सुधारणा आणण्यासाठी आयोग आपल्या उत्तरादायित्वाची भूमिका पार पाडेल याचा मी पुनरूच्चार करत आहे. विद्युत अधिनियम, २००३ चे उद्दिष्ट कमीत कमी वेळेत आणि या क्षेत्राशी संबंधितांना किमान धक्का पोहोचेल याची दक्षता घेऊन साध्य करण्याबाबत आयोग वचनबध्द आहे.

व्ही.पी.राजा

**(व्ही.पी.राजा)**

## आयोगाच्या बैठका

विद्युत अधिनियम, २००३ खाली आयोगाच्या कार्याचे तीन भाग आहेत. एक) अर्ध-न्यायिक, दोन) वैधानिक आणि तीन) कार्यकारी. ही कार्ये पार पाडताना काही महत्वाच्या बाबींवर आयोगाच्या बैठकांमध्ये चर्चा होऊन निर्णय घेण्यात येतात. सन २०१०-११ या वर्षात आयोगाच्या खाली दर्शविल्याप्रमाणे पाच बैठका झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | १२५ वी बैठक | ०२ जुलै, २०१० |
| २) | १२६ वी बैठक | १९ जुलै, २०१० |
| ३) | १२७ वी बैठक | १३ ऑगस्ट, २०१० |
| ४) | १२८ वी बैठक | ०१ सप्टेंबर, २०१० |
| ५) | १२९ वी बैठक | ३१ मार्च, २०११ |

## राज्य सल्लागार समिती

सन २०१०-११ या अहवाल वर्षात राज्य सल्लागार समितीच्या चार बैठका झाल्या. सन २०१०-११ या वर्षात खालील मुख्य मुद्यावर विचारविनिमय करण्यात आला.

### १. वाढते वीज दर व भारनियमन

कार्यक्षमतेत भरीव सुधारणा होण्याकरिता वीज मागणीचे योग्य अंदाज करणे, वीज खरेदी करार करणे, वीज प्राप्तीचे नियोजन करण्यासाठी राज्य पारेषण कंपनीशी सतत संपर्क ठेवणे आणि अन्य निर्मात्यांबरोबर अनुभवाचे आदानप्रदान करणे या व इतर मुद्यांवर बैठकांमध्ये भर देण्यात आला. याबाबत असे सुचविण्यात आले की, मोठया प्रमाणात ग्रिडमध्ये स्वस्त दराची वीज उपलब्ध आहे आणि त्यानुसार महावितरण कंपनीने वीज खरेदीचे नियोजन करावे की ज्यामुळे बऱ्याच प्रमाणात त्यांचे परिश्रम कमी होण्यास मदत होईल.

### २. क्रॉस सबसीडी

१) क्रॉस सबसीडीबाबत आतापर्यंतची प्रगती, २) प्रारूप विनियमांचा गोषवारा, ३) प्रारूप विनियमांवर प्राप्त झालेले अभिप्राय, ४) पुढील वाटचाल आणि ५) विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदी, राष्ट्रीय विद्युत धोरण, वीज दर धोरण, विद्युत अपील न्यायाधिकरणाने सर्व क्रॉस सबसिडी कमी करून त्या सरासरी वीज पुरवठा खर्चाच्या +/- २०% मर्यादेत आणण्याबाबत दिलेले निर्देश, या मुद्यांबाबत तपशीलवार सादरीकरण करण्यात आले.

प्रारूप विनियमांत सरासरी वीज पुरवठा खर्चाची पध्दत प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर पध्दतीमुळे वीज पुरवठा खर्चाचे योग्य मूल्यमापन होत नाही, याकरिता असे सूचित करण्यात आले की, वीज पुरवठा खर्च हा व्होल्टेजनुसार असावा आणि सेवा खर्च, पारेषण व वितरण हानि इत्यादी विचारात घेऊन राज्यातील विविध ग्राहकांसाठी वीज पुरवठा खर्चाचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करण्यात यावे. क्रॉस सबसिडी कमी करण्यासाठी आणि वीज दर निश्चितीकरणासाठी व्होल्टेज आणि वर्गवारीवर आधारित वीज पुरवठा खर्च काढणे योग्य राहील.

श्री.एन.डी.पाटील यांनी असे निदर्शनास आणून दिले की, क्रॉस सबसिडी मधील कपात दृष्टीकोन पत्रिका आणि विनियमांमध्ये कृषी क्षेत्राचे प्रश्न कमी-जास्त प्रमाणात दुर्लक्षित राहीले आहे. त्यांनी असेही मत प्रदर्शित केले की, राज्यातील भार नियमनामुळे कृषी वीज ग्राहक सर्वात जास्त बाधित झाले आहेत. सिंचनाकरिता पाणी उचलण्यासाठी त्यांना पुरेसा वीज पुरवठा मिळत नाही. राष्ट्रीय कृषि दर धोरणात (नॅशनल ॲग्रिकल्चरल प्राईसिंग पॉलिसी) जरी कृषीमालासाठी किमान किंमत विहित करण्यात आली असली तरी त्याची अंमलबजावणी शिफारशीनुसार होत नाही. सीएसीपी हे कृषीमालाची किमान आधारभूत किंमत निश्चित करणारे साविधिक प्राधिकरण आहे.

महावितरण कंपनीने असे मत प्रदर्शित केले की, याबाबत संबोधित करावयाच्या समस्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे यावर सर्व परवानाधारक, विद्युत कंपन्या व हितसंबधित यांच्यासोबत प्राथमिक चर्चा करणे आवश्यक आहे. आणखी असेही की, शासनाच्या सबसीडी मंजुरीवर सर्व समस्या आधारीत असल्याने राज्य शासनाच्या नियोजन व वित्त विभागाशी देखील या बाबींवर चर्चा करणे जरूरीचे आहे. प्रारूपास अंतिम स्वरुप देताना मर्यादित वीज पुरवठ्याबाबतचे प्रश्न/समस्या सुध्दा विचारात घेण्याची आवश्यकता आहे.

क्रॉस सबसिडी व मुक्त प्रवेश यांचा बराचसा परस्पर संबंध आहे आणि त्याचा एकत्रित विचार करणे जरूरीचे आहे. यासंबंधी आयोगाचे सदस्य श्री व्ही. एल. सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली एक तांत्रिक समिती स्थापन करण्याचे ठरले.

### ३. समांतर परवाना

समांतर परवान्याबाबत १) वायर्स आणि किरकोळ वीज पुरवठा यांचे अलगीकरण २) वीज दर संबंधित समस्या, ३) किरकोळ वीज पुरवठ्यातील मार्जिन निश्चित करणे, ४) सबसीडी देणाऱ्या ग्राहकांचे स्थलांतर व त्याचे आर्थिक परिणाम, ५) स्थलांतर करण्याची कार्यपध्दती या संबंधातील समस्यांचा तपशील देणारे सविस्तर सादरीकरण झाल्यानंतर चर्चा करण्यात आली. सर्वसाधारण असे मत होते की, मुक्त प्रवेशामुळे वायर्स आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय, जो वितरण व्यवसाय आहे, करणे शक्य होईल. वीज दरातील कमाल मर्यादा निश्चितीकरणाचा प्रश्न, चेरी-पिकींग इत्यादी प्रश्नांचा उहापोह करणे आवश्यक आहे.

### ४. मुक्त प्रवेश

राज्य सल्लागार समितीच्या विविध बैठकामध्ये मुक्त प्रवेशाच्या प्रश्नांवर चर्चा झाली. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने स्थापित केलेल्या फोरम ऑफ रेग्युलेटर्स (एफओआर) यांनी निर्गमित केलेल्या नमुना आंतर-राज्य मुक्त प्रवेश शर्ती व अटी विनियम, २०१० आणि आयोगाने गठीत केलेल्या उप-समितच्या बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या सूचना/प्रश्न विचारात घेऊन प्रारूप १) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम आणि २) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग मविनिआ (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम तयार करण्यात आले आहेत. सदर विनियम हितसंबंधितांकडून सूचना/हरकती प्राप्तीसाठी आयोगाच्या संकेत-स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

### ५. इच्छुक ग्राहक प्रतिनिधींची यादी तयार करणे

राज्य सल्लागार समितीच्या यापूर्वीच्या बैठकामध्ये चर्चा झाल्याप्रमाणे,

''आयोगाने इच्छुक ग्राहक प्रतिनिधींची सूची तयार करणे: आयोगास पुढील कामकाजामध्ये ग्राहकांच्या हिताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी व्यक्तिंना (संस्था आणि व्यक्ति) प्राधिकार देणे'' या संबंधी एक चर्चापत्रिका प्रसिध्द करण्यात आली आहे.

## ६. इतर बाबी

अ. श्री. एस. बी. कुलकर्णी यांनी आयोगाच्या सदस्यत्व पदाचा पदभार सप्टेंबर, २०१० मध्ये सोडला. त्यांनी विद्युत क्षेत्रात विशेषत: महाराष्ट्रातील नियामक चौकटीच्या विकासाकरिता दिलेल्या योगदानाची समितीचे सदस्य व विशेष निमंत्रित यांनी नोंद घेतली आणि सर्वांनी उभे राहून त्यांना अभिवादन केले.

ब. आयोगाने स्वत:चे ''शलाका'' वार्तापत्र सुरू केल्याबाबतची माहिती समितीच्या सदस्यांना दिली. राज्य सल्लागर समितीच्या दि. २४ सप्टेंबर, २०१० रोजी आयोगाच्या अध्यक्षांनी पहिल्या वार्तापत्राचे प्रकाशन केले. बैठकीतील उपस्थितांना वार्तापत्राच्या प्रती वितरीत केल्या.

क. महाराष्ट्र राज्यातील वीज मागणी व वाटप यातील प्रचंड तफावत कमी करण्याची गरज आहे. गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड या शेजारच्या राज्यातील विविध नवीन वीज निर्मिती केंद्राबरोबर वीज खरेदीबाबत चाचपणी करणे आवश्यक आहे. सर्व विद्युत परवानाधारक कंपन्यांनी वर्तमान पारेषण यंत्रणा जाळयांचा विस्तार करणे, भरीव भांडवली गुंतवणूक आकर्षित करणे यावर तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

ड. बहु-वर्षीय वीज दर विनियम दि.०४ फेब्रुवारी, २०११ रोजी अधिसूचित करण्यात आले आणि त्यांची अंमलबजावणी दि.०१ एप्रिल, २०११ पासून करण्यात येणार आहे. या विनियमांच्या अंमलबजावणी-करण्याकरिता सर्वांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. बहु-वर्षीय वीज दराच्या विनियमांमध्ये व्यवसाय आराखडा बंधनकारक असल्यामुळे सर्व विद्युत कंपन्यांनी विलंब टाळण्यासाठी व्यवसाय आराखडा तयार करण्याचे काम सुरु करावे.

## ताजिकिस्तान - किर्गिझस्तानच्या प्रतिनिधीमंडळाची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला भेट

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाबरोबर विविध मुद्यांवर चर्चा करण्यासाठी १८ नोव्हेंबर, २०१० रोजी ताजिकिस्तान आणि किर्गिझस्तान येथील एका प्रतिनिधीमंडळाने आयोगाच्या कार्यालयास भेट दिली. सामाजिक प्रतिनिधी, वीज कंपन्यांचे तसेच सरकार आणि नियामक संस्थांचे अधिकारी यांचा या प्रतिनिधीमंडळात समावेश होता. वीज क्षेत्रात 'सुप्रशासन' यावे यासाठी जागतिक साधन संपत्ती संस्था आणि प्रयास यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत असलेल्या ''विद्युत प्रशासन पुढाकार'' या प्रयत्नाचा एक भाग म्हणून ही भेट आयोजित करण्यात आली होती. विविध देशांमधील वीज व्यवस्थापनाचे अध्ययन करून पारदर्शकता, क्षमता, उत्तरदायित्व आणि जनतेचा सहभाग या संदर्भात निर्णय घेताना येणाऱ्या महत्वाच्या समस्या आणि शक्तिस्थाने यांचे मूल्यमापन करणे हा या भेटीचा उद्देश होता.

आयोगाचे अध्यक्ष श्री. व्ही. पी. राजा यांनी प्रतिनिधीमंडळाचे स्वागत केले. भारतातील वीज क्षेत्र, त्यासमोरील आव्हाने आणि विद्युत अधिनियम, २००३ अनुसार सुरु करण्यात आलेली नियामक प्रक्रिया याबाबतचा संक्षिप्त परिचय श्री. राजा यांनी करून दिला. प्रतिनिधींनी भारतातील वीज क्षेत्राबाबत विविध प्रश्न विचारले. श्री. राजा आणि श्री. विजय सोनवणे, सदस्य यांनी पारदर्शकता आणि सहभाग वाढीच्या वातावरणात वीज क्षेत्रात होणाऱ्या विकासाचा आराखडा मांडला. खुली नियामक प्रक्रिया, भावी आव्हाने आणि आयोगाला अशा पार्श्वभूमीवर काम करताना येणारे अनुभव यांचाही श्री. राजा आणि श्री. सोनवणे यांनी आढावा घेतला.

## नायजेरियन विद्युत नियामक आयोगाची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला भेट

नायजेरियन विद्युत नियामक आयोगाच्या एका शिष्टमंडळाने २७ सप्टेंबर, २०१० रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा अभ्यास दौरा केला. आयोगाचे सदस्य श्री. विजय सोनवणे यांनी शिष्टमंडळाचे स्वागत केले.

नायजेरियाच्या लेखा मानके मंडळाच्या सुकाणू समितीचे सदस्य या शिष्टमंडळात होते. या मंडळावर नायजेरियातील लेखा मानके करण्याची जबाबदारी तेथील सरकारने सोपवली आहे. नायजेरियन विद्युत नियामक आयोग, लेखा मानके मंडळ तसेच सरकारी मालकीच्या वीज निर्मिती, वहन आणि वितरण कंपन्यांचे अधिकारी या शिष्टमंडळात होते. काही खाजगी वीज निर्मिती कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचाही शिष्टमंडळात समावेश होता.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कामकाजाचा परिचय करून देणारे एक सविस्तर सादरीकरण श्री. सोनवणे यांनी शिष्टमंडळासमोर केले. भारताच्या दृष्टीने सर्वसाधारण आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने विशेष अशा प्रमुख मुद्यांचा वीज क्षेत्रविषयक आढावा त्यांनी घेतला. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे कार्य आणि भूमिका समजावून घेण्यासाठी अभ्यागतांनी अनेक प्रश्न विचारले.

## विद्युत क्षेत्रात क्षमता वाढविण्यासाठी पुढाकार

सन १९९१-९२ मध्ये सुरू करण्यात आलेल्या आर्थिक सुधारणामुळे अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाच्या क्षेत्रात परिणामकारक बदल होण्यास सुरूवात झाली आहे. विविध वस्तू व सेवा उपलब्ध करण्यासाठी बहुविध उद्योजक क्षेत्रात आणणे आणि पंच/मध्यस्थ म्हणून कामगिरी बजावण्यासाठी एका नियामकाची नेमणूक करणे अशी संकल्पना होती. जवळपास सर्वच क्षेत्रासाठी नियामकांची नेमणूक करण्यात आली आहे. विद्यमान आणि नवीन उद्योजकांना विकासाची व स्पर्धेची समान संधी मिळेल याची खात्री करणे, मध्यस्थीचे कार्य करून ग्राहकांचे हितरक्षण करणे, ही नियामकाची कामे आहेत. अशा रितीने नियामकाला सेवा पुरवठादाराचे हित आणि ग्राहकांचे हित यांच्यात समतोल राखण्याचे आव्हानात्मक काम करावयाचे असते. या व्यतिरिक्त त्यांना कंपनी/संस्थेच्या वर्धनक्षमतेची काळजी देखील घ्यावयाची असते.

नियामक यंत्रणा ही देशासाठी नवीन आहे. नियामक क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची प्रचंड कमतरता आहे. ज्ञानाच्या अभावाची नोंद घेऊन व नियामक अधिकारी व

विद्यावेतनधारी विश्लेषक यांची नियुक्ती करणारा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग हा पहिला आयोग आहे. ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी आयोगाने बहुविध पुढाकारांची एक मालिकाच सुरू केली आहे. यामुळे हितसंबंधितांना विद्युत नियामक आणि उदयोन्मुक विद्युत बाजारपेठ याबाबतच्या माहितीचा प्रसार करण्यासाठी आयोग आणि विद्युत कंपन्या यांच्यामधील मानव संसाधन विकास यंत्रणेची स्थापना, देखभाल व सदर यंत्रणा टिकवून ठेवणे सुलभ होईल. यामुळे राज्यातील विद्युत क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची भरती करणे, प्रशिक्षण व कुशल मनुष्यबळ टिकवून ठेवणे देखील शक्य होईल.

### १. सन २०१०-११ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने घेतलेले पुढाकार:-

- विद्युत नियमनातील संकल्पना आणि प्रक्रिया या विषयावर यशदा, पुणे आणि के. जी. सोमय्या इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट येथे अनुक्रमे २०१० आणि २०११ मध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.
- वीज क्षेत्राशी संबंधित बाबींवर जागरुकता आणि आकलन वाढविण्यासाठी विद्युत नियमनातील पदव्युत्तर पदविका हा ६ महिने कालावधीचा दुसरा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम जागतिक व्यापार केंद्र, मुंबई येथे आयोजित करण्यात आला. अशा तऱ्हेचा तिसरा अभ्यासक्रम सध्या जागतिक व्यापार केंद्र येथे चालू आहे.
- विद्युत क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी विद्युत क्षेत्रातील अर्थशास्त्र हा २० आठवड्यांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम के. जी. सोमय्या इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् येथे आयोजित करण्यात आला.
- सिम्बोसिस इन्स्टीट्युट ऑफ इंटरनॅशनल बिझनेसच्या एमबीए कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आयोगाच्या पुढाकाराने ऊर्जा आणि पर्यावरण हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.

### २. भावी कार्यक्रम:-

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियामक कर्मचारी विविध विषयांमध्ये सक्षम असण्याची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने एसआयएमआर, मुंबई आणि एसआयआयबी, पुणे यांच्याबरोबर खालील कोर्सेससाठी चर्चा सुरु केली:-

- विद्युत क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी वित्तीय प्रशासन या विषयावर सहा महिन्यांचा प्रशिक्षण कोर्स. नियामकांसाठी विधी साक्षरतेवरील २५ आठवड्यांच्या प्रमाणपत्र कोर्सबाबत सध्या विचार करण्यात येत आहे.

### ३. भावी वाटचाल : विविध दृष्टीकोनांचे एकत्रीकरण

नियामक कार्ये अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले मूलभूत ज्ञान देणाऱ्या या अभ्यासक्रमाची संभाव्य वर्धनक्षमता आणि तंत्रज्ञ आणि शैक्षणिक संस्थांचे या अभ्यासक्रमातील स्वारस्य स्पष्ट झाल्यानंतर आता भारतीय प्रशासकीय सेवा/भारतीय महसूल सेवा यांच्याशी संबंधित शैक्षणिक संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या धर्तीवर विविध विषयांचा समावेश असणाऱ्या अभ्यासक्रमाची आखणी करण्यासाठी प्रयत्न करण्यावर भर देण्याची वेळ आली आहे.

## वीज मागणी व्यवस्थापन

मान्यता दिलेल्या वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमांची प्रगती:

### कृषी - वीज मागणी व्यवस्थापन

भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्त्व विचारात घेऊन आयोगाने मार्च, २०१० मध्ये महावितरण कंपनीकरिता कृषी- वीज मागणी व्यवस्थापन या पथदर्शी कार्यक्रमास मंजूरी दिली. ब्युरो ऑफ एनर्जी इफिशिएन्सी (BEE) च्या मार्गदर्शनाखाली कृषी -वीज मागणी व्यवस्थापन हा पथदर्शी कार्यक्रम राबविणारी महावितरण ही देशाची पहिली विद्युत कंपनी आहे. या पथदर्शी प्रकल्पाचे प्रात्यक्षिक यशस्वीपणे झाल्यानंतर या प्रकल्पाची सर्व देशात प्रतिकृती तयार करणे शक्य होईल. या प्रकल्पामुळे अंदाजे १०.१ दशलक्ष युनिट विजेची बचत अपेक्षित आहे. या पथदर्शी प्रकल्पात ३५०० कृषी पंप बदलणे अंतर्भूत असून त्यासाठी अंदाजित खर्च रू. ७.०६ कोटी अपेक्षित आहे. या कार्यक्रमात सहभाग झालेल्या शेतकऱ्यांकडून महावितरण कंपनीला चांगला प्रतिसाद मिळाला असून, महावितरण कंपनीने आतापर्यंत ११७ उच्च कार्यक्षमतेचे कृषी पंप जागेवर बदली केले आहेत. याबाबतीत महावितरण कंपनीशी करार करण्यासाठी शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर पुढाकार घेत आहे. कृषी अंमलबजावणी अभिकरणाने (ॲग्रीकल्चर इम्प्लीमेंटींग एजन्सी) जवळपास ३८% वीज बचतीची हमी दिली आहे. कृषी - वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमामुळे वीज वितरणाच्या गुणवत्तेत सुधारणा होते आणि तांत्रिक व वाणिज्यिक तोटा कमी होतो.

### टी - ५ एफटीएल कार्यक्रम

आयोगाने टाटा पॉवर कंपनी (वितरण), आर-इन्फ्रा (वितरण), बेस्ट उपक्रम या विद्युत कंपन्यांच्या पारंपरिक टी-८ आणि टी-१२ ट्युबलाईट ऐवजी टी-५ एफटीएल ट्युबलाईट बदली करण्याच्या कार्यक्रमाला मंजूरी दिली. आर-इन्फ्रा (वितरण) आणि टाटा पॉवर कंपनी (वितरण) या विद्युत कंपन्यांनी त्यांचा विक्रेता निश्चित केला असून या कार्यक्रमाद्वारे सुमारे १,५०,००० ट्यबलाईट्स बदलण्यात आल्या आहेत. बेस्ट उपक्रमसुध्दा टी-५ एफटीएल कार्यक्रमास अंतिम स्वरुप देण्याच्या मार्गावर असून या कार्यक्रमामुळे वीज ग्राहकांचा वीज वापर कमी होईल आणि त्यापाठोपाठ ग्राहकांची वीज देयकांची रक्कम कमी होईल.

### सीएफ कार्यक्रम

आयोगाने टाटा पॉवर कंपनी (वितरण), आर-इन्फ्रा (वितरण), बेस्ट उपक्रम या विद्युत कंपन्यांच्या अनुक्रमे २०००, ५००० व ५००० विद्युत कार्यक्षम बीइइ- स्टार रेटेड सिलींग फॅन पथदर्शी कार्यक्रमास मंजूरी दिली. टाटा पॉवर कंपनी (वितरण) या कंपनीने निविदा प्रक्रिया पूर्ण केली असून खरेदी व निवड प्रक्रियेस अंतिम स्वरुप दिले आहे. टाटा पॉवर कंपनी (वितरण) यांनी या प्रकल्पाची माहिती वीज देयकाद्वारे स्वतंत्रपणे जोडून ३२८०० वीज ग्राहकांना दिली व जानेवारी २०११ पर्यंत १५०० पेक्षा अधिक सिलींग फॅन्स् बदलण्यात आले. आर-इन्फ्रा (वितरण) यांनी तांत्रिक व वाणिज्यिक बोली मूल्यमापन पूर्ण केले आणि प्रसार माध्यमांद्वारे वीज ग्राहकांना या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आवाहन केले.

### खिडकीतील वातानुकूलीत यंत्र बसविण्याचा कार्यक्रम (विन्डो एसी कार्यक्रम)

आयोगाने, बेस्ट उपक्रम, टाटा पॉवर कंपनी (वितरण) व आर-इन्फ्रा (वितरण) या विद्युत कंपन्यांनीप्रत्येकी सुमारे २०० खिडकीतील वातानुकूलीत यंत्र बसविण्याचा कार्यक्रम मंजूर केला. आर-इन्फ्रा (वितरण) या विद्युत वितरण कंपनीने उत्पादकाबरोबरचा सांमजस्य करार स्वाक्षांकित केला असून वातानुकूलीत संच बसविण्याच्या कामास एप्रिल, २०११ नंतर सुरुवात होईल. त्याचप्रमाणे टाटा पॉवर कंपनी (वितरण) या विद्युत कंपनीच्या बाबतीत ग्राहकांच्या जागेत ५ स्टार रेटेड वातानुकूलीत संच बसविण्याचे काम सुरू आहे.

### औष्णिक साठवण कार्यक्रम

औष्णिक साठवण कार्यक्रम म्हणजे कमी वीज मागणीच्या कालावधीत जेव्हा स्वस्त वीज पुरवठा उपलब्ध असतो त्या कालावधीत बर्फ/थंड पाण्याची साठवण करण्याची प्रक्रिया आणि जास्त वीज मागणीच्या कालावधीत जेव्हा वीज पुरवठा महागडा असतो त्यावेळी बर्फ/थंड पाण्याचा वापर करणे. आयोगाने टाटा पॉवर कंपनी (वितरण), आर-इन्फ्रा (वितरण), बेस्ट उपक्रम या विद्युत कंपन्यांचा सुमारे ५००० टन वातानुकूलीत कार्यक्रमास मंजूरी दिली. आयोगाच्या मार्गदर्शखाली वरील विद्युत कंपन्या या कार्यक्रमाची तातडीने अंमलबजावणी करीत आहेत. विद्युत कंपन्यांच्या मदतीने नवीन इमारतीसाठी ग्राहकांच्या जागेवर औष्णिक साठवण कार्यक्रमास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सर्वोच्च वीज मागणीच्या कालावधीत सर्वोच्च भार कमी करण्यासाठी किंवा सर्वोच्च मागणीच्या कालावधीतील मागणी सर्वोच्च मागणी नसलेल्या कालावधीत वळविणे यासाठी मुंबई महानगरासाठी हा विशेष कार्यक्रम आहे. यामुळे विद्युत कंपन्यांचा महागड्या दराने वीज खरेदीवरील खर्च कमी होऊन एकूण घरगुती वीज दर देखील कमी होतील.

### जुन्या शीतपेटीऐवजी ऊर्जा कार्यक्षम असलेले स्टार दर्जाचे शीतपेटी

आयोगाने आर-इन्फ्रा (वितरण) कंपनीच्या विशेष कार्यक्रमास मंजूरी दिली आहे की ज्यामध्ये ग्राहकांना प्रत्यक्षपणे रिबेट न देता ऊर्जा कार्यक्षम शीतपेट्या बसवण्यात आल्या आहेत. आर-इन्फ्रा (वितरण) कंपनीने १०००० जुन्या अकार्यक्षम शीतपेट्या बदलण्याचे प्रस्तावित केले आहे.

### कालानुरुप वीज मागणी कार्यक्रम

प्रत्यक्ष वीज दर, वीज वापर यामधील बदल आणि जादा वीज मागणीची परिस्थिती याबाबत ग्राहकांना माहिती देणे यामुळे वीज ग्राहकांचा आत्मविश्वास द्विगुणीत होईल आणि अखंड वीज बचतीच्या कार्यक्रमात त्यांचा सहभाग वाढेल.

मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर यांनी विद्युत गिझर्स बदलण्याचा नवीन प्रस्ताव आयोगास सादर केला. या प्रस्तावात १००० विद्युत गिझर्सची गॅस गिझर्सद्वारे बदली करणे अंतर्भूत आहे. या पध्दतीमध्ये कार्बनचे उत्सर्जन किमान पातळीवर असते आणि त्यामुळे एकूण वीज दर कमी होण्यास सुमारे ०.४५ दशलक्ष युनिट्सची दर महिन्यास बचत होईल तसेच या कार्यक्रमामुळे वीज देयकाची रक्कम देखील कमी होईल. आर-इन्फ्रा वितरण च्या १००० विद्युत गिझर्सची गॅस गिझर्सद्वारे बदली करण्याच्या लक्षित कार्यक्रमामुळे विद्युत देयकाची रक्कम कमी होईल. हा कार्यक्रम वीज मागणी व्यवस्थापन समितीच्या, जी मविनिआ-वीज मागणी व्यवस्थापन, विनियम २०१० अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे, विचाराधीन आहे.

## नूतनशील ऊर्जा

भारताला सौर ऊर्जेची मोठी देणगी आहे. सुमारे ५००० ट्रिलियन युनिट ऊर्जा भारताच्या भू-भागात वर्षभरात उपलब्ध होते त्यापैकी बहुतांश ४ ते ७ युनिट प्रति दिन प्रति चौ. मी. ऊर्जा प्राप्त होते. सौर ऊर्जेचे उष्णता आणि विजेमध्ये रुपांतर करण्यासाठी सौर पीव्ही आणि सौर औष्णिक या दोन्ही सौर ऊर्जा तंत्राचा उपयोग करुन भारतात प्रचंड प्रमाणावर सौर ऊर्जेचे नियमन करणे शक्य आहे. तथापि, सौर ऊर्जेची संभाव्य साधन संपत्ती ही नापीक जमिनीवर अवलंबून असते.

छपरावरील सौर पीव्ही यंत्रणा (रूफ टॉप फोटोव्होल्टॅनिक) आणि जमिनीवर बसवलेली लहान पीव्ही यंत्रणा ११ के व्ही पेक्षा कमी असलेल्या ग्रीडला जोडता येते. सौर ऊर्जेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर देखील वीज निर्मिती करता येऊ शकते व अल्प-कालाधीत ऊर्जेच्या स्थापित क्षमतेत झपाटयाने वाढ करणे शक्य आहे.

ग्रामीण विद्युतीकरणाच्या यथार्थ दृष्टीकोनातून ऑफ ग्रीडचे विकेंद्रीकरण आणि कमी तापमानाची उपकरणे फायदेशीर राहतील. याचा फायदा विजेच्या इतर गरजा भागविण्यासाठी आणि ग्रामीण व शहरी भागातील उष्णता व थंडीचा समतोल राखण्यामध्ये होईल. सौर ऊर्जा प्रकल्पांच्या विकासासाठी मुख्यत्वेकरून अडथळा म्हणजे जागेची उपलब्धता कारण जवळपास सर्वच सौर ऊर्जा तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्प हे उपलब्ध जागेवर अवलंबून आहेत.

महाराष्ट्र राज्यात सौर ऊर्जेच्या विकासाची सुरूवात झाली असल्याने त्यास चालना देण्यासाठी आयोगाने दि.०७.०६.२०१० रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटी चे कार्यान्वयन) विनियम, २०१० अधिसूचित केले. या विनियमातील विनियम ७.१ नुसार ''प्रत्येक बंधन असलेली व्यक्ती/संस्था'' खालील तक्त्यात नमूद केलेली टक्केवारीतील, पात्र नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण झालेली, वीज प्राप्त करून घेईल:-

| वर्ष | नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून (युनिट मधील सममूल्य ऊर्जा) किमान वीज खरेदीचे परिणाम (टक्केवारीत) | | |
|---|---|---|---|
| | सौर | बिगर सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) | एकूण |
| २०१०-११ | ०.२५% | ५.७५% | ६.०% |
| २०११-१२ | ०.२५% | ६.७५% | ७.०% |
| २०१२-१३ | ०.२५% | ७.७५% | ८.०% |
| २०१३-१४ | ०.५०% | ८.५०% | ९.०% |
| २०१४-१५ | ०.५०% | ८.५०% | ९.०% |
| २०१५-१६ | ०.५०% | ८.५०% | ९.०% |

आयोगाने दि.०७.०६.२०१० रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० देखील अधिसूचित केले आहेत. या विनियमतील विनियम ८ नुसार सामान्य वीज दरच्या निश्चितीकरणाचे आदेश आयोगाने स्वत: पुढाकार घेऊन निर्गमित केले. या आदेशान्वये विविध नूतनशील ऊर्जा प्रकल्पांसाठी लेव्हलाइज्ड वीज दर निश्चित करण्यात आला. हे विनियम व आदेश आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (इ) अन्वये सोपविण्यात आलेल्या जबाबदारीनुसार विविध नूतनशील ऊर्जा स्त्रोतांना विकासाला चालना देण्यासाठी आयोगाने प्रकरण क्र.६५/२००९ खाली मे.सोलापूर बायोएनर्जी सिस्टीम प्रा.लि. च्या नगरपालीका घन कच-यावर आधारीत संयंत्रासाठी रू.४.८८ प्रति युनिट लेव्हलाइज्ड वीज दर निश्चितीचे आदेश दि.०३ सप्टेबर, २०१० रोजी पारित केले. सदरचे वीज दर महाराष्ट्र राज्यात पुढील २० वर्षाकरीता लागू राहतील.

## परवाना मंजूर करणे

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ अंतर्गत राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा विकसित करण्यांसाठी पारेषण परवान्याला मंजूरी मिळण्यासाठी महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडचा अर्ज (सन २००९ चे प्रकरण क्र.११८)**

२०१३-१४ सालापर्यन्त ८१०० मेगावॉट क्षमतेच्या येऊ घातलेल्या ५ विद्युत कारखान्यांमधून विजेचे वहन करण्यासाठी, सहयोगी उपकेंद्रे आणि बें सह २ X ७६५ के.व्ही.एस.सी तिरोडा-कोराडी-अकोला-औरंगाबाद वाहिन्यांचा अंतर्भाव असलेले महाराष्ट्राच्या राज्यातील पूर्व भागातील ७६५ के.व्ही.राज्यांतर्गत पारेषण जाळे विकसित करण्यांसाठी मे.महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड आणि मे.अदानी एन्टरप्राईजेस लिमिटेड या दोहोंमधील प्रस्तावित संयुक्त उपक्रम कंपनी मे.महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४, ज्यामध्ये सन २००६ मध्ये सुधारणा केली गेली त्या अन्वये, पारेषण परवाना मंजूर करावा म्हणून अर्ज सादर केला. या प्रकरणांत ''तांत्रिक छाननी बैठक'' दिनांक १७ एप्रिल, २०१० रोजी घेण्यात आली. या प्रकरणांत आयोगाने दिनांक १७ ऑगस्ट, २०१० रोजी जाहीर सुनावणी घेतली आणि दिनांक १४ सप्टेंबर, २०१० रोजीच्या आदेशाने मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड ला सन २०१०चे क्र. १ चा पारेषण परवाना मंजूर केला. आयोगाने मत प्रदर्शित केले की, मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने, या प्रकरणी तांत्रिक, वाणिज्यिक आणि वित्तीय आवश्यकता पूर्ण केली असल्याने आयोगाच्या (पारेषण परवाना अटी), विनियम, २००४, ज्यामध्ये सन २००६ मध्ये सुधारणा करण्यात आली त्या अन्वये, पारेषण परवाना प्राप्त करण्यासाठी ती पात्र ठरते.

**विद्युत अधिनियम,२००३च्या कलम १४ अन्वये (अ) सिन्नर टीपीपी ते बाभळेश्वर उप केंद्रापासून ४०० के.व्ही.डी/सी क्वाड मूज पारेषण वाहिनी, (ब) बाभळेश्वर उपकेंद्र येथे दोन ४०० के.व्ही. वाहिनी ने यांचा समावेश असलेल्या पारेषण यंत्रणेच्या विकासासाठी पारेषण परवान्याच्या मंजूरीसाठी मे. सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडचा अर्ज (सन २०१० चे प्रकरण क्र.३१)**

(अ) सिन्नर टीपीपी ते बाभळेश्वर उपकेंद्रापासून ४०० के.व्ही./डी.सी. क्वाड मूज पारेषण वाहिनी, (ब) बाभळेश्वर उपकेंद्र येथे दोन ४०० के. व्ही. वाहिनी बे यांचा समावेश असलेल्या पारेषण यंत्रणेच्या विकासासाठी मे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड आणि मे. इंडिया बुल्स् रिअलटेक लिमिटेड, या दोन कंपन्यांमधील प्रस्तावित संयुक्त उपक्रम कंपनी मे. सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४, ज्यामध्ये सन २००६ मध्ये सुधारणा केली गेली त्या अन्वये, पारेषण परवाना मंजूर करावा म्हणून दिनांक २० जुलै,२०१० रोजी अर्ज सादर केला. या प्रकरणांत ''तांत्रिक छाननी बैठक'' दिनांक २१ सप्टेंबर, २०१० रोजी घेण्यांत आली. या प्रकरणांत आयोगाने दिनांक २० डिसेंबर,२०१० रोजी जाहीर सुनावणी घेतली आणि दिनांक २८ डिसेंबर,२०१० रोजीच्या आदेशाने मे. सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड ला सन २०१० चे क्रमांक २ चा पारेषण परवाना मंजूर केला. आयोगाने मत प्रदर्शित केले की, मे. सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने, तांत्रिक, वाणिज्यिक आणि वित्तीय आवश्यकता पूर्ण केली असल्याने आयोगाच्या (पारेषण परवाना अटी), विनियम,२००४, ज्यामध्ये सन २००६ मध्ये सुधारणा करण्यात आली त्या अन्वये, पारेषण परवाना प्राप्त करण्यासाठी ती पात्र ठरते.

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ अन्वये, (अ)४०० के.व्ही.डी/सी क्वाड मूज अमरावती टीपीपी-अकोला एस/एस् पारेषण वाहिनी, (ब) अमरावती टीपीपी येथे ४०० के.व्ही.एस./सी चा एस्.आय्.एल्.ओ.अकोला ते कोराडी पारेषण वाहिनी (क) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड अकोला उपकेंद्र येथे दोन ४०० के.व्ही. वाहिनी बे यांचा समावेश असलेल्या पारेषण यंत्रणेच्या विकासासाठी पारेषण परवान्याच्या मंजूरीसाठी मे. अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडचा अर्ज (सन २०१०चे प्रकरण क्र.३२)**

(अ) ४०० के.व्ही. डी/सी क्वाड मूज अमरावती टीपीपी-अकोला एस्.एस्.पारेषण वाहिनी, (ब) अमरावती टीपीपी येथे ४०० के.व्ही.एस्./सी.चा एल्.आय.एस्.ओ.अकोला ते कोराडी पारेषण वाहिनी (क) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड अकोला उपकेंद्र येथे दोन ४०० के.व्ही. वाहिनी बे यांचा समावेश असलेल्या पारेषण यंत्रणेच्या विकासासाठी मे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.लि.आणि इंडिया बुल्स् रिअलटेक लिमिटेड या दोहोंमधील प्रस्तावित संयुक्त उपक्रम कंपनी मे. अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम,२००४, ज्यामध्ये सन २००६ मध्ये सुधारणा केली गेली त्या अन्वये, पारेषण परवाना मंजूर करावा म्हणून दिनांक २० जुलै,२०१० रोजी अर्ज सादर केला.या प्रकरणात ''तांत्रिक छाननी बैठक'' दिनांक २१ सप्टेंबर,२०१० रोजी घेण्यात आली. या प्रकरणांत आयोगाने दिनांक २० डिसेंबर,२०१० रोजी जाहीर सुनावणी घेतली आणि दिनांक ३० डिसेंबर,२०१० रोजीच्या आदेशाने मे. अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड ला सन २०१० चे क्रमांक ३ चा पारेषण परवाना मंजूर केला. आयोगाने मत प्रदर्शित केले की, मे.अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने, तांत्रिक, वाणिज्यिक आणि वित्तीय आवश्यकता पूर्ण करीत असल्याने आयोगाच्या (पारेषण परवाना अटी) विनियम,२००४, ज्यामध्ये सन

२००६ मध्ये सुधारणा करण्यांत आली त्या अन्वये, पारेषण परवाना प्राप्त करण्यांसाठी पात्र ठरते.

**मुळा-प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी मर्यादितच्या क्षेत्रात वीज पुरवठयासाठी वितरण परवाना मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण कंपनी) आणि मुळा-प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी मर्यादितचा अर्ज (सन २०१० चे प्रकरण क्र.८५ आणि सन २०१० चे प्रकरण क्र.८७)**

मुळा-प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी मर्यादित या सोसायटीचा वितरण परवाना दिनांक ३१ जानेवारी २०११ रोजी संपत असल्यामुळे, विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम १४ सह कलम ८६(१) (ड) च्या अनुषंगाने आयोगाने त्यांच्या दिनांक २८ जुलै, २०११ च्या सूचनेव्दारा मुळा-प्रवरा विद्युत सहकारी संस्थेच्या क्षेत्रात वीज वितरणाचे काम अंगिकरणासाठी स्वारस्य असलेल्या आणि त्या संबंधात ज्यांना वितरण परवाना घेण्यासाठी मंजूरी हवी आहे अशा वीज वितरणाचे विशेष ज्ञान असलेल्या संभाव्य अर्जदारांकडून, ज्यामध्ये व्यापारी संघ / संयुक्त उपक्रम यांचा समावेश आहे, इरादा पत्रे मागविली. या प्रकरणामध्ये, दिनांक २ डिसेंबर, २०१० रोजी महावितरण कंपनी आणि मुळा-प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी मर्यादित, या दोन्ही अर्जदारांच्या उपस्थितीत ''संयुक्त छाननी बैठक'' घेण्यात आली. या प्रकरणात, आयोगाने दिनांक १४ जानेवारी, २०११ रोजी जाहीर सुनावणी घेतली आणि दिनांक २७ जानेवारी, २०११ रोजी आदेश पारित केला. अनुभव आणि तांत्रिक क्षमता, वीज प्राप्तीची योजना, भांडवलाची पर्याप्तता आणि पत पात्रता या तीन निकषांच्या आधारे मुळा-प्रवरा विद्युत सहकारी संस्था मर्यादित यांचा वितरण परवान्याचा अर्ज आयोगाने फेटाळला, उपरोल्लेखित सर्व तीन निकषांची समाधानपूर्वक पूर्तता महावितरण कंपनी करीत असल्यामुळे आयोगाने विद्युत अधिनियम, २००३च्या कलम १४ अन्वये त्यांच्या संबंधित क्षेत्रात दिनांक १ फेब्रुवारी २०११ पासून वीज वितरण करण्यांसाठी परवाना मंजूर केला. आयोगाने मुळा-प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी मर्यादितला त्यांचे संपूर्ण वितरण जाळे आणि सर्व संबध्द साधने/यंत्रसामुग्री आणि मालमत्ता महावितरण कंपनीकडे सोपविण्याचा आदेश दिला. तथापि, मुळा-प्रवरा विद्युत सहकारी संस्था मर्यादितने मालमत्ता हस्तांतरित केल्यामुळे सदर मालमत्तेच्या मूल्याचा दावा सादर करण्यांसाठी ती सोसायटी पात्र राहील.

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११

### पार्श्वभूमी

नियामक आयोगांनी, विद्युत नियामक आयोग, २००३ नुसार, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अटी आणि शर्ती निश्चित करताना, बहु-वर्षीय वीज दराच्या तत्वांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ अधिसूचित झाल्यानंतर केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने (सीईआरसी) १ एप्रिल, २००९ ते ३१ मार्च २०१४ या नियंत्रण कालावधीसाठी केंद्रीय विद्युत नियामक आयोग, वीज दराचे विनियम अधिसूचित केले आणि भारत सरकारच्या वीज मंत्रालयाने राष्ट्रीय विद्युत धोरण आणि वीज दर धोरण अधिसूचित केले, ज्यामध्ये महसुली गरज आणि वीज दर निश्चित करणासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने देखील सुधारित बहु-वर्षीय वीज दर विनियमांमध्ये पहिल्या नियंत्रण कालावधीतील अनुभव समाविष्ट करण्याचे ठरविले. त्यामुळे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सर्व हितसंबंधितांशी उचित विचारविनिमय केल्यानंतर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम तयार करण्याचा निर्णय घेतला.

### ठळक वैशिष्टये

बहु-वर्षीय वीज दर विनियम हे कामगिरीवर आधारित विनियम असून त्यामध्ये कामकाजातील कार्यक्षमतेला उचित महत्व देण्यात आले आहे आणि सध्याच्या वार्षिक वीज दर निश्चितीकरण पध्दतीऐवजी बहु-वर्षीय वीज दराची चौकट अंगिकारण्यात आली आहे, ज्यामध्ये आधी निश्चित केलेल्या पध्दतीने विशिष्ट मापदंडाच्या मूल्यामध्ये झालेल्या बदलामुळे केवळ वीज दरातील बदलास परवानगी देण्यात येईल. विद्युत कंपनीला भेडसावणारी आणखी एक अडचण म्हणजे दीर्घ-कालीन नियोजन शिस्तीचा अभाव ही होय. कामकाजासंबंधी अल्प-कालीन दृष्टीकोन बाळगण्याऐवजी, बहु-वर्षीय वीज दर विनियमामध्ये ५ वर्षांचा व्यवसाय आराखडा सादर करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये विद्युत कंपनीची विजेची मागणी व पुरवठ्याबाबतची सद्यस्थिती, वीज प्राप्तीची योजना आणि ५ वर्षे कालावधीत साध्य करावयाची कामकाजातील अपेक्षित कार्यक्षमता आणि विजेच्या मागणीत होणारी वाढ भागविण्यासाठी करावी लागणारी आवश्यक भांडवल गुंतवणूक, दाखवावयाची असते. पुढील पाच वर्षाचा नियंत्रण कालावधी हा १ एप्रिल, २०११ ला सुरु होईल आणि तो ३१ मार्च २०१६ पर्यंत चालू राहील.

जोपर्यंत वितरण परवानाधारक आवश्यक विजेच्या परिमाणासाठी सर्वात जास्त दराने दीर्घ-कालीन किंवा मध्यम-कालीन करार करीत नाही, तोपर्यंत भार नियमन चालू ठेवणे किंवा भार नियमन सुसह्य/ सौम्य करण्यासाठी अल्प-कालीन कराराखाली जास्त दराने वीज घेणे हे दोन पर्याय उपलब्ध असतात. ज्याचा परिणाम शेवटी वीज दरात वाढ होण्यात होतो. दीर्घ-कालीन नियोजनाचा उद्देश हा शक्य असेल तितके भार नियमन टाळणे आणि ग्राहकांना अखंडितपणे विजेचा पुरवठा चालू ठेवणे शक्य व्हावे यासाठी इष्ट दराने दीर्घ-कालीन/ मध्यम-कालीन/अल्प-कालीन करारान्वये पुरेशी वीज उपलबध होऊ शकेल याची आणि वीज दर देखील वाजवी राहतील याची काळजी घेणे हा आहे. निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक आणि वितरण परवानाधारकांना लागू असलेली गुंतवणूक योजना ही विद्युत कंपनी बळकट करण्यासाठी आणि तिच्या कार्यात वाढ करण्यासाठी करावी लागणारी कमी खर्चाची असावी.

बहु-वर्षीय वीज दर विनियामांतर्गत, नियंत्रणाधीन असलेले व नियंत्रणाधीन नसलेले घटक विनिर्दिष्ट करण्यात आलेले आहेत. नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांवर होणारा खर्च वीज दराच्या माध्यमातून ग्राहकांकडून वसूल करण्यात येतो, तर नियंत्रणाधीन असलेल्या घटकामुळे होणारा फायदा किंवा तोटा हा विद्युत कंपनी आणि ग्राहक यांच्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने विभागण्यात येतो.

बहु-वर्षीय वीज दराची चौकट खालील घटकांवर आधारित आहे :

(एक) पाच वर्षाच्या नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी सविस्तर व्यवसाय आराखडा आणि एकूण महसुली गरज आणि बहु-वर्षीय वीज दर याचिका सादर करणे;

(दोन) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून विशिष्ट घटकांसाठी मार्गदर्शिका विनिर्दिष्ट करण्यात आली आहे, यामध्ये प्रोत्साहन-अधिदान देऊन किंवा न देऊन, अर्जदाराची कामगिरी सुधारण्याचा प्रयत्न करण्यात येतो;

(तीन) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून कामगिरीच्या बदलाचे मान्यताप्राप्त अंदाज आणि वर्गवारीच्या तुलनेत प्रत्यक्ष कामगिरीचा मध्यम-कालीन आढावा घेण्यात येईल आणि त्यामध्ये आढळणाऱ्या तफावतींची वर्गवारी नियंत्रणाधीन असलेले घटक आणि नियंत्रणाधीन नसलेले घटक म्हणून करण्यात येईल;

(चार) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा ग्राहकांकडून वसूल करण्याची पध्दती;

(पाच) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे फायदा किंवा तोटा विद्युत कंपनी आणि ग्राहक यांच्यात विभागण्याची पध्दत;

(सहा) नियंत्रण कालावधीच्या सुरुवातीला संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी वीज दर निश्चित करण्यात येईल;

(सात) नियंत्रणाधीन नसलेल्या घटकामुळे झालेला वितरण परवानाधारकाचा फायदा किंवा तोटा परवानाधारकाच्या वीज दरामध्ये 'झेड' घटकाच्या माध्यमातून सहामाही तत्वावर समायोजित करण्यात येईल.

बहु-वर्षीय वीज दराच्या विनियमांमध्ये मुक्त प्रवेश सुलभ करण्यासाठी आणि स्पर्धेच्या पातळीत वाढ करण्यासाठी वीज निर्मिती, पारेषण, वायर्स आणि पुरवठा व्यवसाय, वायर्स आणि पुरवठा व्यवसायाचे लेखे वेगळे करणे या बाबींसंबंधीच्या कामकाजाचे निकष आणि आर्थिक तत्वे हाताळण्यात आले आहेत, ज्यामुळे वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेत सुधारणा होईल आणि वीज दर कमी होऊ शकतील.

### ग्राहक आणि विद्युत कंपन्यांना होणारे लाभ

**बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीची आखणी खालील उद्दीष्टे साध्य करण्यासाठी करण्यात आली आहेत:-**

- नियामक पध्दतीमध्ये पारदर्शकता, सातत्य यास चालना देऊन त्याद्वारे नियामक जोखमीची संभावना कमी करुन विद्युत कंपन्या, गुंतवणूकदार आणि ग्राहकांना नियामक व्यवस्थेची खात्री देणे.
- नियंत्रणाधीन असलेल्या आणि नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांवर आधारित विद्युत कंपन्या आणि ग्राहक यांच्यामध्ये जोखमीची विभागणी करण्याची पध्दत निश्चित करणे.
- विद्युत क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, वाढीची खात्री देण्यासाठी आणि ग्राहक हिताचे रक्षण करण्यासाठी या क्षेत्राची आर्थिक वर्धनक्षमता सुनिश्चित करणे.
- वीज निर्मिती, पारेषण, वितरण आणि पुरवठा व्यवसायासाठी कामकाजाचे निकष निश्चित करताना पहिल्या नियंत्रण कालावधीतील प्रत्यक्ष कामगिरी आणि अलीकडच्या घटना विचारात घेणे.
- कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यास चालना देणे.
- नजिकच्या काळात वीज दराचे सुसुत्रीकरण करणे.

## भार नियमन

**महावितरण कंपनीची कळवा उप-विभागासह ठाणे २ शहर विभागामध्ये भार नियमन रद्द करण्याबाबत याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र. ८९)**

ठाणे २ शहर विभागाकरिता मान्यता मिळालेल्या शून्य भार नियमन मॉडेलमध्ये कळवा उप-विभागाचा समावेश करण्यासाठी महावितरण कंपनीने याचिका दाखल केली. आयोगाने ठाणे येथे जाहीर सुनावणी आयोजित केली आणि सन २००९ च्या प्रकरण क्र. ८९ मध्ये दि. २४ मे २०१० रोजी आदेश पारित केला. या आदेशान्वये ४१ पैसे/युनिट याप्रमाणे विश्वासार्हता आकार लावून कळवा उप-विभागामध्ये भार नियमन रद्द करण्यास मान्यता देण्यात आली.

**आळीपाळीने पाण्याचा वापर करण्याच्या कालावधी दरम्यान भार व्यवस्थापन योजनेसाठी ३ फेज वीज उपलब्धतेत वाढ करण्यासाठी महावितरण कंपनीची याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र. १२ आणि ४८)**

संगमनेर विभागात आळीपाळीने पाण्याचा वापर करण्याच्या कालावधी दरम्यान भार व्यवस्थापन योजनेसाठी ३ फेज विजेच्या उपलब्धतेकरिता मान्यता मिळण्यासाठी आणि वाढलेल्या ३ फेजमुळे पडणाऱ्या भाराची त्याच विभागात भरपाई करण्यासाठी महावितरण कंपनीने सन २००९ च्या प्रकरण क्र. १२ नुसार याचिका दाखल केली. डॉ सुशीलकुमार आणि सुखदेव रहांगडाळे आणि अन्य यांनी समर्पित फिडरवरील उपसा जलसिंचन योजनेवरील भार नियमन रद्द करण्यासाठी (सन २००९ च्या प्रकरण क्र. ४८) याचिका दाखल केली. आयोगाने या प्रकरणी अनेक एकत्रित जाहीर सुनावण्या घेतल्या आणि या प्रकरणांमध्ये सचिव, महाराष्ट्र जल स्रोत नियामक प्राधिकरण यांना विशेष निमंत्रित म्हणून सहभागी केले. उचित नियामक प्रक्रियेनंतर, या दोन्ही प्रकरणी दि. ९ सप्टेंबर, २००९ रोजी एकत्रित आदेश पारित केला. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-

- विजेच्या अनुपलब्धतेमुळे उभ्या पिकांवर विपरित परिणाम होऊ नये ही भावना आयोगास उचित वाटली. शेती हे एक उत्पादक क्षेत्र असल्यामुळे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख घटक असल्यामुळे, शेतीच्या कमी उत्पादकतेसाठी विजेची अनुपलब्धता हे एक कारण असता कामा नये.
- नाशिक जिल्ह्यातील संगमनेर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यामध्ये शेती भार व्यवस्थापन योजनेमध्ये ३ फेज विजेची उपलब्धता केवळ आळीपाळीने पाण्याचा वापर करण्याच्या कालावधी दरम्यान ८ तासांवरुन ११ तासांपर्यंत वाढविण्यात येईल आणि त्याच विभागात हा वाढीव भार समायोजित करण्यात येईल.
- अन्य सर्व प्रकरणांसाठी, महावितरण कंपनी, शेती भार व्यवस्थापन योजनेसाठी ज्यावेळी लागेल त्यावेळी ३ फेज विजेची उपलब्धता, अशा वाढीव उपलब्धतेच्या समायोजनासाठी भार नियमनात वाढ सोसाव्या लागणाऱ्या बाधित हितसंबंधित/स्थानिक शेतकऱ्यांच्या संमतीने, या प्रकरणात मान्यता दिलेल्या तत्वांना अनुसरुन आवश्यक उपाययोजना करु शकेल.

- आयोगाने महावितरण कंपनीला असे निर्देश दिले की, आयोगासमोर कामातील प्रत्यक्ष अडचणी मांडण्यासाठी आणि व्यवहार्य तोडगा काढण्यासाठी, संबंधित सिंचन मंडल प्रकल्पामधील आळीपाळीने पाण्याचा वापर करण्याच्या कालावधीचा भार नियमन तासांशी समन्वय साधण्याकरिता, महावितरणच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ''कालवा सल्लागार समन्वय समिती'' च्या बैठकीस दरवर्षी उपस्थित राहावे.

**सन २००९ च्या प्रकरण क्र. ३१ मध्ये महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रातील महसूल विभागाच्या मुख्यालयातील भार नियमन रद्द करण्यासाठी अतिरिक्त पुरवठा आकारांच्या निश्चितीकरण प्रकरणातील आदेशातील मुदतीत वाढ करण्यासाठी याचिका (सन २०१० प्रकरण क्र. ७६ दि. २६.११.२०१० आणि २४.२.२०११)**

आयोगाने, महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रातील महसूल विभागाच्या मुख्यालयातील भार नियमन रद्द करण्यासाठी अतिरिक्त पुरवठा आकाराच्या निश्चितीकरणासाठीच्या महावितरण कंपनीच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. ३१ मध्ये दि. ३० नोव्हेंबर, २००९ रोजी, आदेश पारित केला. हा आदेश १ डिसेंबर, २००९ ते ३० नोव्हेंबर, २०१० या १२ महिन्यांच्या कालावधीसाठी लागू होता.

त्यानंतर, महावितरण कंपनीने महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रातील महसूल विभागाच्या मुख्यालयातील भार नियमन रद्द करण्यासाठीच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. ३१ मधील ३० नोव्हेंबर, २००९ च्या आदेशाच्या मुदतीत वाढ मिळण्याकरिता दि. १ नोव्हेंबर, २०१० रोजी (सन २००९ चे प्रकरण क्र. ७६) याचिका दाखल केली. या याचिकेच्या प्राथमिक चाचणीनंतर, आयोगाला, याचिकेचा एक भाग म्हणून महावितरणने काही अतिरिक्त माहिती सादर करणे आवश्यक असल्याचे व ही माहिती सादर करण्यासाठी महावितरण कंपनीला अतिरिक्त वेळेची गरज लागणार असल्याचे, आढळून आले. त्यामुळे, आयोगाने दि. २६ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या आदेशाने, वरील सन २००९ च्या प्रकरण क्र. ३१ मधील ३० नोव्हेंबर, २००९ च्या आदेशाच्या मुदतीत तीन महिन्यांनी, म्हणजेच १ डिसेंबर, २०१० ते २८ फेब्रुवारी २०११ किंवा सन २०१० च्या प्रकरण क्र. ७६ मधील अंतिम निकाल लागेपर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्याप्रमाणे, वाढविली.

याशिवाय, सन २०१० च्या प्रकरण क्र. ७६ मध्ये १६ डिसेंबर, २०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. या सुनावणीदरम्यान, नाशिक विभागाच्या मुख्यालयाचा समावेश करण्याची सूचना करण्यात आली. त्यानंतर, महावितरण कंपनीने त्याच्या प्रस्तावात नाशिक विभागाच्या मुख्यालयाचा समावेश केला. सन २०१० च्या प्रकरण क्र. ७६ मधील कार्यवाही चालू होती आणि अंतिम आदेश पारित करण्यास ज्यादा अतिरिक्त वेळेची गरज होती. वरील दि. ३० नोव्हेंबर, २००९ चा आदेश, सर्व हितसंबंधितांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि शून्य भार नियमन मॉडेलला त्यांचा असलेला पाठींबा विचारात घेतल्यानंतर, निर्गमित करण्यात आलेला असल्यामुळे, काळाच्या ओघात वरील मॉडेल पुढे चालू ठेवले नाही तर त्यामुळे ग्राहकांना भार नियमनाला सामोरे जावे लागेल. त्यामुळे जनहिताच्या दृष्टीकोनातून, आयोगाने, २६ नोव्हेंबर, २००९ च्या आदेशासह सन २००९ च्या प्रकरण क्र. ३१ मधील दि. ३० नोव्हेंबर, २००९ च्या वरील आदेशाची मुदत, १ मार्च, २०११ ते ३० जून २०११ किंवा सन २०१० च्या प्रकरण क्र. ७६ मध्ये अंतिम निकाल पारित होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्याप्रमाणे, वाढविली.

**गडचिरोली जिल्ह्यातील भार नियमन रद्द करण्याबाबत महावितरण कंपनीची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र. २५)**

नक्षलग्रस्त भागातील लोकांच्या मदतीच्या उद्देशाने गडचिरोली जिल्ह्यातील भार नियमन रद्द करण्यासाठी परवानगी मागण्याकरिता सन २०१० च्या प्रकरण क्र. २५ मध्ये महावितरण कंपनीने याचिका दाखल केली. आयोगाने १५ डिसेंबर, २०१० च्या आदेशात महावितरण कंपनीच्या उद्देशाबाबत समाधान व्यक्त केले. तथापि, आयोगाकडून असे स्पष्ट करण्यात आले की, गडचिरोली जिल्ह्यातील भार नियमन रद्द करणे शक्य होण्यासाठी महावितरण कंपनीच्या अतिरिक्त विजेच्या गरजेचा खर्च राज्यातील अन्य भागात राहणाऱ्या ग्राहकांना सोसायला लावणे अन्यायकारक होईल. शिवाय, याच आदेशात महावितरणला असे निर्देश देण्यात आले की, त्यांनी गडचिरोली जिल्ह्यातील भार नियमन रद्द करण्यासाठीच्या निधीकरिता महाराष्ट्र शासनाशी संपर्क साधावा आणि त्यानंतर या प्रकरणी नवीन याचिका दाखल करावी.

**महाराष्ट्रातील प्रमुख वीज निर्मिती केंद्राच्या परिसरातील ५ किलोमीटरमधील गावांसाठी भार नियमन रद्द करण्याबाबत महावितरण कंपनीची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र. ९४)**

महाराष्ट्रातील प्रमुख वीज निर्मिती केंद्राच्या परिसरातील ५ किलोमीटरमधील गावांसाठी भार नियमन रद्द करण्यासाठी महावितरण कंपनीने सन २०१० च्या कलम ९४ नुसार याचिका दाखल केली. आयोगाने दि १० फेब्रुवारी, २०११ च्या आदेशात महावितरणच्या कृतीबाबत समाधान व्यक्त केले. तथापि, खालील बाबींचे स्पष्टीकरण देण्याबाबत महावितरण कंपनीला निर्देश दिले:-

- वीज केंद्राच्या परिसरातील भार नियमन रद्द करण्यासाठी वितरण परवानाधारक किंवा निर्मिती कंपनी यांनी सामाजिक जबाबदारी घेतली आहे का;
- ५ कि.मी. ची सीमा कशी निश्चित करण्यात येईल;
- ५ कि.मी. सीमेच्या आतील गावांना पुरवावयाच्या वीज पुरवठ्याचे फिडर अलग करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयींचा खर्च कोण करेल;
- किती क्षमतेपर्यंतची वीज संयंत्रे यामध्ये समाविष्ट करण्यात येतील;
- मध्यवर्ती क्षेत्रातील विद्युत प्रकल्प आणि खाजगी क्षेत्रातील विद्युत प्रकल्प इ. च्या बाबतीत हा प्रस्ताव कसा लागू करण्यात येईल.

प्रमुख वीज निर्मिती केंद्रांच्या सभोवतालच्या गावांतील भार नियमन रद्द करण्याचा प्रश्न ही जनहिताची धोरणात्मक बाब असल्याने आणि अशा बाबीं केवळ राज्य सरकारशी विचारविनिमय केल्यानंतरच निश्चित करण्यात याव्यात, म्हणून आयोगाने या प्रश्नावर महावितरण कंपनीला सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र शासन, यांच्याशी चर्चा करण्याचे निर्देश दिले. महाराष्ट्र शासनाशी चर्चा झाल्यानंतर, महावितरण कंपनी या प्रकरणी सुधारित याचिका दाखल करु शकेल.

## मुक्त प्रवेश

**मे. सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लि. ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ (३) आणि ४३ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम ३ आणि १८(२) आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन)**

**विनियम, २००५ च्या विनियम ९२-९४ अंतर्गत दाखल केलेली याचिका (सन २०१० च्या प्रकरण क्र. ०६)**

- आयोगाने ११ मे २०१० च्या नोटीशी अन्वये, या प्रकरणी २२ जून, २०१० रोजी याचिका दाखल करुन घेण्यासंबंधात सुनावणी आयोजित केली. आयोगाने प्रतिवादींना देखील याचिकेला त्यांचे उत्तर, असल्यास, दाखल करण्याचे व त्याची प्रत याचिकाकर्ता आणि ग्राहक प्रतिनिधींना देण्याचे निर्देश दिले. प्रतिवादी क्र. २ ने सुनावणीच्या दिवशी उत्तर दाखल केले. प्रतिवादी क्र. १ कडून कोणतेही उत्तर आले नाही.
- याचिका दाखल करुन घेण्यासंबंधात २२ जून २०१० रोजी झालेल्या सुनावणीत, श्री अमित जाजू, ॲडव्होकेट यांनी याचिकाकर्त्याचे प्रतिनिधित्व केले आणि श्री व्ही. के. पंडित आणि श्री आर. व्ही. दंडपूर यांच्यासह श्री मृदल चक्रवर्ती, ॲडव्होकेट, यांनी प्रतिवादी क्र. १ चे प्रतिनिधित्व केले आणि श्री आर.जी. सोनवणे, अधिक्षक अभियंता (वाणिज्यिक) प्रतिवादी क्र. २ च्या वतीने उपस्थित राहिले.
- सुनावणीच्या वेळी याचिकाकर्त्याच्या वकिलांनी याचिकेत मांडलेल्या म्हणण्याचा पुनरुच्चार केला. याचिकाकर्त्याने सादर केले की, ते प्रकल्पाचा विस्तार करण्याचे काम करीत असून त्यांना सदर प्रकल्प विस्ताराच्या कामास सुरुवात करण्यासाठी त्यांना अतिरिक्त वीज पुरवठ्याची तातडीने गरज आहे.
- प्रतिवादी क्र. २, महावितरण, ने २१.६.२०१० च्या त्याच्या उत्तरात मान्य केले की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ आणि आयोगाने या संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार, ते याचिकाकर्त्याच्या इच्छेप्रमाणे मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून वीज पुरवठा करण्यास तयार आहेत.
- आयोगाने असे मत व्यक्त केले की, ज्या समस्यामध्ये विद्युत अधिनियम, २००३ चे कलम ४२(३) आणि ४३ (ज्यामध्ये अनुक्रमे भेदभावरहित मुक्त प्रवेश मंजुरीसाठी कॉमन कॅरियरने पुरवठा करण्यासाठी आणि विनंती केल्यास पुरवठा करावयाचा असल्यास, त्याबाबतची वितरण परवानाधारकाची कर्तव्ये नमूद करण्यात आली आहेत) उपस्थित करण्यात आले असतील आणि आयोगाने त्यामधील तरतुदी अंमलात आणण्याची जबाबदारी असेल, तर अशा समस्यांचा आयोगाने अभ्यास करण्याची गरज आहे. मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटीवर एक वितरण परवानाधारक म्हणून, अर्ज करण्यात आल्यावर अशा जागेला अतिरिक्त वीज पुरवठा, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालमर्यादेत, करण्याचे बंधन आहे.

**मे. प्रभात डेअरी प्रा. लि. ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ आणि ४३ तसेच मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम ३ आणि १८ (२) अंतर्गत दाखल केलेली याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र. २७)**

- आयोगाने दि. २० जुलै २०१० च्या नोटीशीने दि. ३ ऑगस्ट २०१० रोजी जाहिर सुनावणी आयोजित केली. आयोगाने प्रतिवादींना त्यांचा याचिकेवरील अभिप्राय, असल्यास, याचिकाकर्त्याला पाठवून त्याची एक प्रत ग्राहक प्रतिनिधींना पाठविण्यास कळविले. प्रतिवादी क्र. २ ने त्यांचे उत्तर सुनावणीच्या दिवशी म्हणजेच ३ ऑगस्ट २०१० रोजी दाखल केले आणि प्रतिवादी क्र. १ ने त्यांचे उत्तर १७ ऑगस्ट २०१० रोजी दाखल केले.
- मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ मधील विनियम ३.१ ने ज्या ग्राहकाची करारांतर्गत मागणी ''१ एमव्हीए पेक्षा कमी नसेल'' तरच असा ग्राहक मुक्त प्रवेशासाठी मागणी करण्यास पात्र आहे.
- आयोगाला असे दिसून आले की, जरी याचिकाकर्त्याची सध्याची गरज १ एमव्हीए इतकी नसली तरी जसजशी कामात वाढ होईल तसतशी ती १ एमव्हीए पेक्षा जास्त होणार आहे. त्यामुळे आयोगाने, सन २०१० च्या प्रकरण क्र.२७ मधील आदेशाद्वारे, मुळा-प्रवरा सोसायटी याचिकाकर्त्याची भावी गरज भागवू शकण्यास समर्थ नसल्याने, महावितरण कंपनीकडून मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रत निकषांमधून त्याला सूट देण्याचे ठरविले आहे. त्यामुळे आयोग ज्या याचिकाकर्त्याची जागा मुळा प्रवरा सोसायटीच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात आहे त्याला मुक्त प्रवेश मागण्यासाठी विनियम ३ (मुक्त प्रवेशासाठी पात्रता) लागू करण्यातून सूट देते.
- महावितरण कंपनीने याचिकाकर्त्याला मुक्त प्रवेश मंजूर करुन वीज पुरवठा करावा आणि त्यासाठी याचिकाकर्ता मुळा प्रवरा विद्युत जाळ्याचा वापर करेल आणि आयोग ठरवेल त्याप्रमाणे वहन आकार अदा करेल.
- आयोग मुळा प्रवरा सोसायटीला आदेश देते की, त्यांनी याचिकाकर्त्याला मुक्त प्रवेशाची सुविधा ताबडतोब कृतीच्या मानकात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत उपलब्ध करुन द्यावी; असे न केल्यास कृतीच्या मानकांच्या विनियमांमधील भरपाई देण्याच्या तरतुदी लागू होतील. मुक्त प्रवेशासाठी वहन आकाराच्या संदर्भात मुळा प्रवरा सोसायटी हे आकार निश्चित करण्यासाठी आयोगासमोर याचिका दाखल करु शकेल. वहन आकार निश्चित न करण्यात आल्याच्या कारणास्तव ग्राहकाला/ अर्जदाराला मुक्त प्रवेश नाकारता येणार नाही.
- हे निर्देश प्रतिवादींना लागू असतील आणि त्यांचे पालन केल्याबाबतचा अहवाल आयोगाला आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सादर करण्यात येईल.

## वीज दराचे आदेश

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.च्या निर्मिती व्यवसायाची आर्थिक वर्ष २००८-०९ करिता अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० करिता वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ करिता वीज दर निश्चितीकरणास मंजुरी देण्यासाठी याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र. ९९)**

- आयोगाने विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या अपील क्र. १११/२००८ मधील निकालाचा होणारा परिणाम विचारात घेतला आणि आर्थिक वर्ष २००६-०७ आणि आर्थिक वर्ष २००७-०८ मधील वीज दराच्या आदेशात मंजूर करण्यात आलेल्या स्थिर खर्चाचा आढावा घेतला.
- आयोगाने, पूर्वी केलेल्या स्थिर खर्चाच्या सर्व बाबींकरिता पूरक ठरेल असे समाधानकारक स्पष्टीकरण देण्यास विद्युत कंपनीला, कळविले. ज्या बाबींच्या संदर्भात विद्युत कंपनी असे स्पष्टीकरण देऊ शकली नाही, उदा. खेळत्या भांडवलावरील व्याजाची मागणी, आयोगाने असा खर्च नामंजूर केला.

- आयोगाने एप्रिल ते सप्टेंबर २००९ या वर्षाच्या पहिल्या सहामाहीकरिता प्रत्यक्ष कामगिरीचा आढावा घेतला आणि ऑक्टोबर २००९ ते मार्च २०१० या उर्वरित सहामाहीकरिता आरइन्फ्रा-निर्मिती कंपनीने महत्वाच्या बाबींसाठी, जसे उष्णता दर, सहाय्यकारी वापर, उपलब्धता, संयंत्र भार घटक (पीएलएफ) आणि कोळसा इंधनाची प्रवासातील हानी, यांच्या संबंधातील सादर केलेले कामगिरीचे सुधारित अंदाज, आयोगाने नियामक निकष लावून मंजूर केले.
- आयोगाने विद्युत कंपनीला आर्थिक वर्ष २००९-१० करिता आरइन्फ्रा-निर्मितीच्या वार्षिक लेख्यांवर आधारित प्रत्यक्ष खर्च व महसुलाची माहिती, अंतिम समायोजन करण्यासाठी, सादर करण्यास कळविले.
- आर्थिक वर्ष २०१०-११ करिता मान्यताप्राप्त कामकाजाचे मापदंड आणि अंदाजित इंधनाची किंमत यांच्यावर आधारित, आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता डीटीपीएस साठी ऊर्जा आकारांचा दर (एक्स-बस) मंजूर केला. आयोगाने असेही निर्देश दिले की, इंधन किमतीमधील कोणतीही तफावत इंधन समायोजन सूत्रानुसार हाताळण्यात येईल.

**टाटा पॉवर कंपनीच्या निर्मिती व्यवसायाची आर्थिक वर्ष २००८-०९ करिता अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० करिता वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ करिता वीज दराच्या निश्चितीकरणास मंजुरी देण्याकरिता याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र. ९६)**

- वरील वीज दराचा आदेश पारित करताना, आयोगाने, आर्थिक वर्ष २००७-०८च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या आयोगाच्या आदेशाविरुध्द, टीपीसी-निर्मिती कंपनीने दाखल केलेल्या अपिलावर (अपील क्र. १३७/२००८) विद्युत अपील न्यायाधिकरणाने १५ जुलै, २००९ रोजी दिलेल्या निकालाचा होणारा परिणाम विचारात घेतला.
- सीपीआरआयने युनिटकडून साध्य करता येण्याजोगे मापदंड ठरविण्यासंबंधी अहवाल विचारात घेऊन, आयोगाने, टीपीसी-निर्मितीच्या ट्रॉम्बे युनिट ५ आणि युनिट ६ च्या कामगिरीचा आढावा घेतला.
- आयोगाने, टीपीसी-निर्मितीच्या कम्बाइन्ड सायकल ट्रॉम्बे युनिट ७ च्या ओपन सायकल मोड कामगिरीचे मापदंड, प्रकरणनिहाय, विचारात घेतले.
- टिपीसी निर्मितीच्या आर्थिक वर्ष २००९-१०च्या पहिल्या सहामाहीकरिता प्रत्यक्ष उपलब्धतेवर आणि दुसऱ्या सहामाहीकरिता अंदाजांवर आधारीत, उपलब्धतेच्या सुधारीत अंदाजांना आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ करिता सर्व केंद्रांकरिता, कारण ते प्रमाणानुसार उपलब्धतेपेक्षा जास्त असल्यामुळे, मंजूरी दिली.
- आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता निर्मितीचा खर्च आणि ऊर्जा आकार, यांना मंजूरी दिली.
- आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये जलनिर्मिती प्रकल्पांच्या वार्षिक स्थिर आकारांपेक्षा, टिपीसी-निर्मितीच्या जल निर्मिती प्रकल्पांपासूनची एकूण महसुलाची वसूली जास्त असल्यामुळे, आयोगाने सर्वोच्च मागणीच्या काळातील अधिक वीज निर्मितीमुळे जलनिर्मिती केंद्रांपासूनच्या झालेल्या महसुलाच्या ज्यादा वसूलीच्या ५ टक्के रक्कम निर्मिती कंपनी आणि वितरण कंपनी यांच्यामध्ये ५०:५० या प्रमाणात विभागून घेण्यास परवानगी दिली.

**महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. ( महानिर्मिती कंपनी) ची आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीज दराच्या निश्चितीकरणास मंजूरीसाठी याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र.१०२)**

- विद्युत कंपनीने सादर केलेल्या दस्तऐवजांच्या छाननीवर आधारीत भांडवली खर्च आणि भांडवलीकरणास आयोगाने मंजूरी दिली.
- आयोगाने असा निर्णय दिला की, कोणत्याही एका केंद्राने हाती घेतलेल्या प्रकल्पांच्या कर्ज परतफेडीच्या संबंधात घसाऱ्यातील केवळ त्रुटीच्या आधारे घसाऱ्यासाठी अग्रिम मंजूर करता येत नाही, कारण महानिर्मिती कंपनी ही एक संयुक्त कंपनी असल्यामुळे घसाऱ्यासाठी अग्रिम मंजूर करण्याचा निर्णय, कर्ज परतफेडीच्या एकूण छाननीवर आणि कंपनीच्या मत्तेच्या घसाऱ्याची सद्यस्थिती यांच्या आधारे, घेण्यात येईल.
- आयोगाच्या, सन २००८ च्या प्रकरण क्र.१६ मधील दिनांक ०५ मार्च,२०१० रोजीचा यापूर्वीच्या आदेशाचा संदर्भ केला, ज्यामध्ये आर्थिक वर्ष २००५-०६ आणि आर्थिक वर्ष २००६-०७ च्या संचालन व देखभाल खर्चाचे अचूक समायोजन, विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या निकालास आणि आयोगाच्या दिनांक ०५ मार्च,२०१० च्या आदेशानुसार करण्यात आले होते; या आदेशात आर्थिक वर्ष २००६-०७ चा खर्च हा आधारभूत धरुन त्याआधारे आर्थिक वर्ष २००७-०८ व आर्थिक वर्ष २००९-१० करिता संचालन व देखभाल खर्च सुधारण्यात आले. त्यानंतर, वर संदर्भ केलेल्या आदेशात, आयोगाने आर्थिक वर्ष २००८-०९ च्या संचालन व देखभाल खर्चाचे अचूक समायोजन वरील पध्दतीनुसार केले.
- आयोगाने असा निर्णय दिला की, इंधन खर्चात झालेली कोणतीही वाढ ही इंधन समायोजन आकारांच्या सूत्रानुसार करण्यात येत असल्यामुळे इंधन खर्च आणि कॅलरीफीक मूल्य हे आर्थिक वर्ष २००९-१० च्या शेवटच्या तिमाहीकरिता म्हणजेच जानेवारी-२०१० ते मार्च २०१० करिता सरासरी इंधन खर्च आणि कॅलरीफीक मूल्याच्या सममूल्य इतके विचारात घेतले आणि इंधन किंमतीच्या कोणत्याही वाढीमध्ये विचारात घेतले नाही.
- आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता इंधन खर्च आणि ऊर्जा आकारांना मंजूरी देताना कच्चा कोळसा, धुतलेला कोळसा आणि आयात केलेला कोळसा यांचे मिश्रण विचारात घेतले.
- आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता केंद्र-निहाय प्रमाणानुसार उपलब्धता सीपीआरआयच्या अहवालानुसार मंजूर केली असल्यामुळे, सर्व औष्णिक केंद्रांकरिता आर्थिक वर्ष २०१०-११ दरम्यान स्थिर आकारांच्या पूर्ण वसूलीस मंजूरी दिली आहे.

वरील आदेश ०१ सप्टेंबर,२०१० पासून अंमलात आला असून, या आदेशात मंजूर केलेला वीज दर ०१ सप्टेंबर,२०११ पासून लागू करण्यात आला आहे.

**टाटा पॉवर कंपनीच्या वितरण व्यवसायाची भांडवली खर्च मंजुरीसाठी आणि नुकत्याच सुरु केलेल्या ट्रॉम्बे युनिट क्र. ८ च्या वीज दर निश्चितीसाठी ८ जुलै, २००९ रोजी सादर केलेली याचिका ( सन २००९ चे प्रकरण क्र. ३५)**

- आयोगाने १९ जानेवारी २०१० च्या आदेशान्वये टीपीसी-निर्मिती च्या कोळशावर प्रज्वलित नवीन २५० मेगावॉट ट्रॉम्बे युनिट-८ करिता भांडवली खर्च मंजूर केला आणि सदर युनिटच्या १५० मेगावॉट क्षमतेकरिता (जिची विक्री महाराष्ट्रात करण्यात येईल) आर्थिक वर्ष २००९-१० करिता वीज दर निश्चित केला.
- टीपीसीच्या युनिट-८ मधील विजेच्या विक्रीसाठी बेस्ट उपक्रमाशी १०० मेगावॉट, टीपीसी -वितरण बरोबर ५० मेगावॉट आणि टीपीसी-पारेषण बरोबर उरलेल्या १०० मेगावॉटसाठी टीपीसीने वीज खरेदी करार केले असल्याची आयोगाने नोंद घेतली.
- सदर विद्युत कंपनीने सादर केलेल्या स्थिर खर्चाच्या आकडेवारीचे आयोगाने मूल्यांकन केले आणि सदर १५० मेगावॉट क्षमतेला विभागण्यात आलेल्या स्थिर खर्चाला मंजुरी दिली.
- आयोगाने सदर युनिटच्या स्थिरीकरण कालावधीतील तसेच स्थिरीकरण नंतरच्या कालावधीकरिता कृतीच्या मापदंडांना मंजुरी दिली आणि सदर १५० मेगावॉट क्षमतेच्या युनिटने मुंबईतील वितरण कंपन्यांकरिता मुक्रर केलेल्या ऊर्जेसाठी आर्थिक वर्ष २००९-१० करिता ऊर्जा आकार निश्चित केले.
- आयोगाने, मुंबईमधील वितरण कंपन्यांना विक्री करायच्या १५० मेगावॉट क्षमतेसाठी आणि टीपीसीच्या पारेषण कंपनीला विक्री करावयाच्या १०० मेगावॉट क्षमतेमध्ये या खर्चाची बरोबर विभागणी करणे शक्य व्हावे यासाठी, टाटा पॉवर कंपनीने त्यांच्या ट्रॉम्बे औष्णिक प्रकल्पातील सर्व सामायिक सुविधांबाबतची पुरेशी तांत्रिक माहिती आणि आकडेवारी आयोगाला सादर करण्याचे निर्देश दिले.

**सन २००७ च्या अपील क्र. ८६ आणि ८७ मधील विद्युत अपिल न्यायाधिकरणाच्या निकालावर आणि सीपीआरआयच्या अहवालावर आधारित महानिर्मिती कंपनीच्या निर्मिती केंद्रांसाठी आर्थिक वर्ष २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ करिता अचूक समायोजन करण्याची प्रक्रिया आणि आर्थिक वर्ष २००८-०९ करिता तात्पुरते अचूक समायोजन (सन २००८ चे प्रकरण क्र. १६)**

- आयोगाने, वरील आदेशाद्वारे पूर्वीच्या वीज दराच्या आदेशातील अचूक समायोजन विद्युत अपिल न्यायाधिकरणाच्या निकालास अनुसरुन केले. या निकालाची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे:-आयोगाने, आर्थिक वर्ष २००५-०६ आणि आर्थिक वर्ष २००६-०७ च्या वार्षिक कामगिरीच्या संबंधात दिलेल्या आदेशातील काही निर्देशांना महानिर्मिती कंपनीने आव्हान दिले होते. विद्युत अपील न्यायाधिकरणाने याबाबत आयोगाला, महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक निर्मिती केंद्रांना साध्य करता येईल असे मापदंड निश्चित करण्यासाठी एक त्रयस्थ पक्ष नेमण्याचे निर्देश दिले. त्यानंतर, आयोगाने मे. सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्युट (सीपीआरआय) यांची नेमणूक केली आणि या संस्थेने न्यायाधिकरणाच्या निकालास अनुसरुन तपशीलवार अभ्यास करुन त्यांचा अहवाल सादर केला.
- आयोगाने निर्मिती कंपनीला न्यायाधिकरणाच्या निकालाने होणाऱ्या परिणामाबाबतची माहिती सादर करण्यास सांगितले व त्याप्रमाणे आर्थिक वर्ष २००५-०६ पासून त्यांची वर्षनिहाय गरज देखील सादर करण्यास सांगितली.
- सीपीआरआयच्या अहवालावर आधारित, आयोगाने महानिर्मिती कंपनीच्या सर्व औष्णिक केंद्रांच्या कामगिरीचा आढावा घेतला आणि इंधन किमतीचे विश्लेषण केले.
- पूर्वीच्या वर्षांकरिता महसूल आणि खर्चाच्या करावयाच्या अंतिम अचूक समायोजनावर आधारित, आयोगाने या कालावधीतील सदर औष्णिक निर्मिती केंद्रांच्या स्थिर खर्चाचे आणि ऊर्जा खर्चाचा होणारा परिणाम निश्चित केला.
- आयोगाने सदर विद्युत कंपनीला त्याच्या पूर्वीच्या वर्षासाठी करण्यात आलेल्या अचूक समायोजनाच्या रकमांच्या वसुलीच्या पध्दतीसंबंधी निर्देश दिले.

**मे. डॉडसन-लिन्डब्लॉम हायड्रो पॉवर प्रा. लि. यांची ३४ मेगावॉट भंडारदरा जल प्रकल्प-टप्पा २ च्या वीज दराच्या फेरनिश्चितीकरणासाठी याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र. १०५)**

- आयोगाने सदर आदेशाद्वारा ३४ मेगावॉट भंडारदरा जल प्रकल्प - टप्पा २ च्या वीज दराची फेरनिश्चिती, विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या निकालास अनुसरुन, केली. याबाबतची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे. मे. डॉडसन-लिन्डब्लॉम हायड्रो पॉवर प्रा. लि.यांनी सन २००८ च्या प्रकरण क्र. २७ मधील ८ जुलै २००९ च्या पूर्वीच्या वीज दराच्या आदेशाविरुध्द विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे अपील केले होते. विद्युत अपील न्यायाधिकरणाने सन २००९ च्या अपील क्र. १५१ आणि अपीलकर्त्याच्या इंटरलोक्युटरी अर्ज (आयए) क्र. २६५/२००९ च्या संदर्भात आपला निकाल २३ डिसेंबर २००९ रोजी दिला. या निकालातील निर्देशांनुसार, मे. डॉडसन-लिन्डब्लॉम हायड्रो पॉवर प्रा. लि. यांनी ७ जानेवारी २०१० रोजी एक याचिका सादर करुन भंडारदरा जल विद्युत प्रकल्प (टप्पा २) च्या वीज दराच्या फेरनिश्चितीकरणाची मागणी केली. आयोगाने सदर अपील दाखल करुन घेतले आणि याबाबत जागेवर सुनावणी घेऊन वरील वीज दराच्या आदेशाद्वारे अपीलकर्त्याच्या वीज दराचे फेरनिश्चितीकरण केले.
- विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्देशांनुसार, आयोगाने, सुनावणीच्या वेळी तज्ज्ञांनी व्यक्त केलेली मते आणि अपीलकर्त्यांनी सादर केलेल्या पुरवणी माहितीच्या आधारे, अपीलकर्त्याने कामकाजपूर्व म्हणून दाखविलेल्या भांडवली खर्चाची तपशीलवार छाननी केली.
- प्रकल्पाच्या कामकाज सुरु झाल्यानंतरच्या नुतनीकरण आणि आधुनिकीकरण खर्चाच्या अतिरिक्त भांडवलीकरणासाठी आयोगाने, प्रमाणानुसार कर्ज भागभांडवल गुणोत्तर हे ७०:३० विचारात घेतले आहे.
- आयोगाने, अपीलकर्त्याने नियोजित भांडवली खर्चासाठी आयोगाकडून ''तत्वत: मंजुरी'' मागताना विनिर्दिष्ट कार्यपध्दती अनुसरावी आणि सदर खर्च कामकाजपूर्व भांडवली खर्च म्हणून समाविष्ट करु नये, असे निर्देश अपीलकर्त्याला दिले.

**टाटा पॉवर कंपनीने (पारेषण व्यवसाय), आर्थिक वर्ष २००८-०९ च्या एकूण महसूली गरजेचे अचूक समायोजन,आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या एकूण महसूली गरजेच्या मंजूरीसाठी दाखल केलेली याचिका (सन २००९चे प्रकरण क्र. ९७)**

आयोगाने दिनांक ३ सप्टेंबर, २०१० च्या आदेशानुसार टाटा पॉवर कंपनी (पारेषण) चा आर्थिक वर्ष २००९-१० मधील वार्षिक कामगिरीचा आढावा घेतला तसेच आर्थिक वर्ष २०१०-११ साठी १ सप्टेंबर, २०१० पासून लागू होणारा वीज दर निश्चित केला. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणें होती :-

- आयोगाने प्रत्यक्ष आकडेवारीच्या आधारे आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन केले आणि कार्यक्षम लाभ /हानी आणि आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये करावयाची विभागणी विचारात घेतली.
- एकूण महसुली गरज म्हणून आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करीता रु.२९६.७३ कोटी मंजूर केले.
- आयोगाने असे निरिक्षण नोंदविले की, पारेषण परवानाधारकाच्या पारेषण प्रणालीच्या उपलब्धतेसाठी प्रोत्साहन-अधिदानाविषयीचे दावे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून प्रमाणित होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी, आयोगाने टाटा पॉवर कंपनीस (पारेषण) निर्देश दिले की, आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ मधील आवश्यक त्या प्रमाणीकरणाची राज्य भार प्रेषण केंद्राकडून व्यवस्था करण्यात यावी. तसेच, आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला असेही निर्देश दिले की, त्यांनी विविध पारेषण परवानाधारकांच्या पारेषण प्रणालीची उपलब्धता नियमितपणे प्रमाणित करण्यासाठी आणि संनियंत्रण करण्यासाठी योग्य अशी कार्यपध्दती आखावी. त्यानुसार, आयोगाने पारेषण उपलब्धतेसाठी प्रोत्साहन-अधिदान रकमेचा हिशोब ९८ टक्क्यांपेक्षा अधिक काढला व त्याप्रमाणे प्रोत्साहन-अधिदानाची रक्कम रु. २.८५ कोटी इतकी येते.
- टाटा पॉवर कंपनीने प्रतिपादन केले की,भार नियंत्रण केंद्र जी विविध कार्ये करते ती महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र करीत नाही आणि म्हणून खर्चाची पुनरुक्ती झालेली नाही. त्यानुसार आयोगाने टाटा पॉवर कंपनीची एलसीसी अचूक समायोजनाकरिता विचारात घेतली. संचालन आणि देखभालीवर भार नियंत्रण केंद्राचा खर्च अधिक असल्यामुळे आयोगाने संपूर्ण खर्च संचालन आणि देखभालीचा एक हिस्सा म्हणून विचारात घेतला. टाटा पॉवर कंपनीने सादर केल्याप्रमाणे, अचूक समायोजनेसाठी भार नियंत्रण केंद्राच्या खर्चाचे, निर्मिती, पारेषण आणि वितरण व्यवसायांकरिता केलेले वाटप, आयोगाने स्विकारले.
- आयोगाने आर्थिक वर्ष २००९-१० च्या सुधारीत एकूण महसुली गरजेला मान्यता दिली आणि आर्थिक वर्ष २०१०-११ चे पारेषण दर निश्चित केले.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या पारेषण व्यवसायाच्या आर्थिक वर्ष २००८-०९ च्या एकूण महसुली गरजेचे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या एकूण महसुली गरजेच्या मंजूरीसाठी दाखल केलेली याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र.१००)**

आयोगाने दिनांक ३ सप्टेंबर,२०१० च्या आदेशानुसार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (पारेषण) चा आर्थिक वर्ष २००९-१० मधील वार्षिक कामगिरीचा आढावा घेतला तसेच आर्थिक वर्ष २०१०-११ साठी १ सप्टेंबर, २०१० पासून लागू होणारा वीज दर निश्चित केला. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होती.:-

- आयोगाने आर्थिक वर्ष २००८-०९ मधील प्रत्यक्ष महसूल आणि खर्च यांच्या सर्व भागांचे विश्लेषण केले आणि आवश्यक तपासणी केल्यानंतर खर्च व महसूल यांचे अचूक समायोजन केले.
- एकूण महसुलाची गरज म्हणून आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करीता रु.९२.७५ कोटी मंजूर केले.
- आयोगाने नियंत्रण करण्यासारख्या घटकांपासून मिळणाऱ्या एकूण कार्यक्षमता लाभांचे अंदाज केले आणि त्यांची विभागणी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीज दरांचे विनियम, २००५ यांना अनुसरुन, परवानाधारक आणि पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते यांच्यामध्ये करण्यात आली.
- आयोगाने असे निरिक्षण नोंदविले की, पारेषण परवानाधारकाच्या पारेषण प्रणालीच्या उपलब्धतेसाठी प्रोत्साहन-अधिदानविषयीचे दावे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून प्रमाणित होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आयोगाने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- पारेषण ला निर्देश दिले की, आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ मधील आवश्यक त्या प्रमाणिकरणाची राज्य भार प्रेषण केंद्राकडून व्यवस्था करण्यात यावी. तसेच आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला असेही निर्देश दिले की, त्यांनी विविध पारेषण परवानाधारकांच्या पारेषण प्रणालीची उपलब्धता नियमितपणे प्रमाणित करण्यासाठी आणि संनियंत्रण करण्यासाठी योग्य अशी कार्यपध्दती आखावी.
- आयोगाने आर्थिक वर्ष २००९-१०च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्याला मंजुरी दिली तसेच आर्थिक वर्ष २०१०-११ करिता एकूण महसुली गरज मंजूर केली ही, आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ करिता मंजूर केलेल्या संचालन व देखभाल खर्चातील कपात, आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ करिता मंजूर केलेल्या प्राप्ती कराच्या खर्चातील घट, विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या निवाड्याच्या परिणामामुळे आर्थिक वर्ष २००६-०७ आणि आर्थिक वर्ष २००७-०८ च्या अचूक समायोजनेमधील कपात या कारणांमुळे, आर-इन्फ्रा पारेषण कंपनीने मुख्यत: अंदाजित केलेल्या रकमेपेक्षा कमी आहे.

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि. ने आर्थिक वर्ष २००८-०९ च्या एकूण महसुली गरजेचे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या एकूण महसूली गरजेच्या मंजूरीसाठी दाखल केलेली याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र.१०३)**

आयोगाने दिनाक १० सप्टेंबर, २०१० च्या आदेशानुसार आर्थिक वर्ष २००९-१० मधील वार्षिक कामगिरीचा आढावा घेतला तसेच आर्थिक वर्ष २०१०-११ साठी १ सप्टेंबर, २०१० पासून लागू होणारा वीज दर निश्चित केला. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होती:-

- आयोगाने प्रत्यक्ष आकडेवारीच्या आधारे आर्थिक वर्ष २००९-१० चे अचूक समायोजन केले आणि कार्यक्षमता लाभ/ हानी आणि आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये करावयाची विभागणी विचारात घेतली.
- पारेषण वीज दरातून निव्वळ एकूण महसुली गरज म्हणून आयोगाने

रु.२२६४.२५ कोटी मंजूर केले.

- आयोगाने निरिक्षण नोंदविले की, पारेषण परवानाधारकाच्या पारेषण प्रणालीच्या उपलब्धतेसाठी प्रोत्साहन-अधिदानविषयीचे दावे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून प्रमाणित होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी, आयोगाने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड ला निर्देश दिले की, आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ मधील आवश्यक त्या साईट प्रमाणीकरणाची राज्य भार प्रेषण केंद्राकडून व्यवस्था करण्यात यावी. तसेच आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला असेही निर्देश दिले की, त्यांनी विविध पारेषण परवानाधारकांच्या पारेषण प्रणालीची उपलब्धता नियमितपणे प्रमाणित करण्यासाठी आणि संनियंत्रण करण्यांसाठी योग्य अशी कार्यपध्दती आखावी.
- आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ च्या पारेषण दरातून वसूल करावयाची एकूण महसुली गरज मंजूर केली जी, आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या भांडवलीकरणात केलेल्या कपातीच्या परिणामस्वरुप एकूण स्थिर मालमत्ता, व्याजावरील खर्च आणि भागभांडवलावरील परताव्यामध्ये कपात, महापारेषण कंपनीचे लेखे 'इस्सार'कडून कंपनी कायद्यामध्ये स्थलांतारीत झाल्यामुळे कर्ज-परतफेड तरतुदीचा परिणाम, आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ साठी मंजूर प्राप्ती करातील घट आणि महसुली तुटीचे समायोजन, या कारणामुळे महापारेषण कंपनीने मुख्यत: अंदाजित केलेल्या रकमेपेक्षा कमी आहे.

### आर्थिक वर्ष २०१०-११ साठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकरिता पारेषण दर (सन २००९ चे प्रकरण क्र. १२०)

आयोगाने, १९ सप्टेंबर, २०१० च्या आदेशान्वये आर्थिक वर्ष २०१०-११ साठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी, १ सप्टेंबर, २०१० पासून लागू होणारा, पारेषण दर निश्चित केला. या आदेशाच्या ठळक वैशिष्ट्यांमध्ये खालील बाबींचा समावेश आहे :-

- आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ साठी दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश व्यवहारासाठी रु.१६४.६८ प्रति किलोवॉट प्रति महिना किंवा रु. ५४१४ प्रति मेगावॉट प्रति दिवस आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेश व्यवहारांसाठी रु. १३५३.५० प्रति मेगावॉट प्रति दिवस किंवा रु. ५६.४० प्रति मेगावॉट याप्रमाणे पारेषण दर निश्चित केला,
- आयोगाने स्पष्ट केले की, कोणत्याही पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा वापर, अभिहस्तांतरण आणि वापर न झालेली पारेषण क्षमता परत करणे, या बाबींचे नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम ९ द्वारे करण्यात येईल.
- आयोगाने राज्य पारेषण कंपनीला निर्देश दिले की त्यांनी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून पारेषण दर प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या शेवटी वसूल करावेत. असा पहिला मासिक कालावधी १ सप्टेंबर, २०१० पासून सुरु होईल. एकूण महसुली गरजेची वसुली राज्य पारेषण कंपनीवर राज्यांतर्गत पारेषण आकारासाठी देयक पाठवून करण्यात येईल आणि मान्यता देण्यात आलेली एकूण महसुली गरज, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या शेवटी वसूल केलेल्या पारेषण दरातून करण्यात येईल.
- आयोगाने स्पष्ट केले की, सुरुवातीच्या पाच महिन्यामधील (म्हणजेच एप्रिल २०१० ते ऑगस्ट २०१०) आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये लागू असलेल्या पारेषण दराऐवजी, आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये लागू असलेल्या पारेषण दराच्या आकारणीपासून मिळणाऱ्या महसुलातील शिल्लक किंवा तूट पारेषण परवानाधारकाच्या पुढील वर्षाच्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या वेळी अचूक समायोजन करताना विचारात घेण्यात येईल.
- आयोगाने असा निर्णय दिला की, प्रत्येक कॅलेंडर महिन्यासाठीच्या पारेषण दरानुसार मासिक देयकाचा भरणा पुढील कॅलेंडर महिन्याच्या १४व्या दिवशी देय राहील. पारेषण परवानाधारकाने मागणी केलेल्या रकमेची वेळेवर हिशोबपूर्ती करणे राज्य पारेषण कंपनीला शक्य व्हावे यासाठी, सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी पारेषण दराचा भरणा वेळेवर करण्याची काळजी घ्यावी. कोणत्याही पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून रकमेचा भरणा करण्यास विलंब झाल्यास, प्रति महिना किंवा महिन्याच्या भागाकरिता १.२५ % दराने विलंब भरणा अधिभार लागू करण्यात येईल.
- आयोगाने असे निरीक्षण नोंदवले की, महावितरण कंपनी आणि परवानाधारक यांनी 'केंद्रीकृत पुलिंग व्यवस्था' (म्हणजेच अंतरिम संतुलन हिशोबपूर्तीची पध्दत-आयबीएसएम) कार्यान्वित करण्याकामी मागील तीन वर्षात लक्षणीय प्रगती केली आहे. राज्यामध्ये विद्युत बाजारपेठेच्या कामकाजासाठी एक संस्थात्मक चौकट आणि नियमन चौकट महाराष्ट्र राज्य विद्युत समितीच्या रुपाने गठीत करण्यात आली असून ती कार्यान्वित देखील झाली असल्याबद्दल आयोगाने समाधान व्यक्त केले.

### सध्याच्या अंतरिम समतोल आणि हिशेब चुकता करणाऱ्या यंत्रणेबरोबर अंतिम समतोल आणि हिशेब चुकता करणाऱ्या यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी मे.आर.इन्फ्रास्ट्रक्चरची याचिका (सन २०१०चे प्रकरण क्र.०९)

अंतिम समतोल आणि हिशेब चुकता करणाऱ्या यंत्रणेच्या अंमलबजावणीमध्ये उशीर होत असल्यामुळे, सध्याच्या उर्जेचा लेखा आणि हिशेब चुकता करण्यांची म्हणजेच अंतरिम समतोल आणि हिशेब चुकता करण्यांची यंत्रणा चालू ठेवावी लागत असल्यामुळे मे.आर.इन्फ्रास्ट्रक्चर-वितरणच्या ग्राहकांना आर्थिक बोजा सहन करावा लागत असल्यामुळे मे.आर.इन्फ्रास्ट्रक्चर-वितरणने या यंत्रणेत सुधारणा करण्यांसाठी याचिका सादर केली. आयोगाने दिनांक २३ ऑगस्ट, २०१० च्या आदेशाने निर्णय दिला की, खालील कारणांमुळे संचित-हिशेब चुकता करणाऱ्या यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यांची आवश्यकता नाही:-

- अंतरिम समतोल आणि हिशेब चुकता करणाऱ्या यंत्रणेमध्ये आणि अंतिम समतोल आणि हिशोब चुकता करणाऱ्या यंत्रणेमध्ये असंतुलीत हिशेब चुकता करणाऱ्या यंत्रणा निकोप आर्थिक तत्वावर आधारित असून त्या या पूर्वीच याचिकाकर्त्यांने, मे.आर.इन्फ्रास्ट्रक्चर-वितरणने मान्य केल्या असून या याचिकेतसुध्दा मान्य केल्या आहेत.
- वाजवी भावाने वीज खरेदी करण्यांसाठी मे. आर.इन्फ्रास्ट्रक्च–वितरण दीर्घ-कालीन/मध्यम कालीन कालखंडासाठी वीज खरेदी कंत्राटाचा करार करते. त्यामुळे अंतिम समतोल आणि हिशेब चुकता करणाऱ्या यंत्रणेच्या अंमलबजावणीनंतर सुध्दा अधिक खर्चाच्या वीज खरेदीचा प्रश्न सुटणार नाही.

## आर्थिक वर्ष २०११-१२ करिता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या अंदाजपत्रकासाठी मंजूरी मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र.९०)

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम १८.१ खाली आर्थिक वर्ष २०११-१२ करीता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या परिचालन खर्चाच्या अर्थसंकल्पासाठी आयोगाची मंजूरी मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडने दिनांक २९ नोव्हेंबर,२०१० रोजी याचिका दाखल केली. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे महसूली अंदाजपत्रक दोन भागांचे आहे:-

(अ) महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र संचालन खर्चाचे अंदाजपत्रक

(ब) महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र भांडवल आकाराचे अंदाजपत्रक

कर्मचाऱ्यांवरील खर्च, प्रशासन आणि सर्व साधारण खर्च, दुरुस्ती आणि देखभालीचा खर्च, खेळत्या भांडवलीवरील व्याज, राज्य भार प्रेषण केंद्र शुल्क आकार आणि डब्ल्यु आर पी सी आकार यांचा अंतर्भाव असलेल्या संचालन खर्चाच्या अंदाजपत्रकात आयोगाने मंजूरी दिली. घसारा, व्याज आणि वित्तीय आकार आणि समभागाचा परतावा यांचा अंतर्भाव असलेल्या भांडवली आकाराच्या अंदाजपत्रकाला सुध्दा आयोगाने मंजूरी दिली. आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला निर्देश दिले की, त्यांनी त्यांचे लेखे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडपासून वेगळे करावेत, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्रासाठी स्वतंत्र ताळेबंद ठेवावा, तसेच घटक-निहाय लेख्यांबाबतच्या लेखा मानकांचा उपयोग महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या कामकाज आणि आर्थिक बाबींचा अधिक तपशील देण्याकरिता करता येईल का, याची तपासणी करावी.

- आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडला निर्देश दिले की, त्यांनी भांडवली खर्चाच्या योजनांची अंमलबजावणी अग्रक्रमाने होईल याची खात्री करावी तसेच आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडला निर्देश दिले की, त्यांना, जर विलंब झाला असेल तर त्यांच्या कारणांसह आणि गतिमार्गाच्या दुरुस्तीसाठी उपाययोजना करण्याची सुरुवात केली आहे त्याबद्दलचा मासिक अहवाल सादर करावा.
- आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला निर्देश दिले की, त्यांनी प्रत्येक पारेषण परवानाधारकाच्या पारेषण प्रणालीची उपलब्धता प्रमाणित करण्यासाठी यंत्रणा विकसित करावी व त्यामध्ये उपलब्ध पारेषण क्षमतेचा तपशील समाविष्ट करावा. हा तपशील महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करावा.

## आर-इन्फ्रा-वितरण व्यवसायाच्या आर्थिक वर्ष २००७-०८ चे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००८-०९ च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २००९-१० च्या वीज दर निश्चितीकरणाच्या याचिकेतील पुनर्विलोकन आदेश रद्द करणे

आयोगाने ०८ सप्टेंबर,२००९ च्या आदेशाने ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया (ए एस सी आय) या संस्थेची, विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम १२८ मधील तरतूदीनुसार आर-इन्फ्रा-वितरणच्या कामकाजाची तपासणी करण्यासाठी ''तपास प्राधिकरण'' म्हणून नेमणूक केली.

आयोगाला ए एस सी आय कडून त्यांच्या दिनांक ०९ जुलै,२०१० च्या पत्रासोबत तपासणी अहवाल प्राप्त झाला. सदर तपासणी अहवालातील, आर-इन्फ्रा-वितरणने खूप मोठया प्रमाणावर उच्च दराने बाहय स्त्रोतांकडून केलेली वीज खरेदी आणि असंतुलन पूल मधून काढलेली वीज यामुळे त्यांच्या विजेचे दर मोठ्या प्रमाणात वाढले, हा निष्कर्ष आणि आर-इन्फ्रा-वितरणकडून प्राप्त झालेले निवेदन विचारात घेऊन, आयोगाने ०९ सप्टेंबर,२०१० च्या आदेशाद्वारे यापूर्वीचा सन २००८ च्या प्रकरण क्र.१२१ मधील दिनांक १५ जून,२००९ चा अंतरिम स्थगिती आदेश रद्द केला.

## टाटा पॉवर कंपनीच्या वितरण विभागाची आर्थिक वर्ष २००८-०९चे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीज दराच्या निश्चितीकरणाची याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र.९८)

आयोगाने १२ सप्टेंबर,२०१० च्या आदेशाद्वारे टाटा पॉवर कंपनीच्या वितरण व्यवसायाच्या (टीपीसी-डी) आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेतला तसेच आर्थिक वर्ष २०१०-११ करिता ०१ सप्टेंबर,२०१० पासून लागू होणारे वीज दर निश्चित केले. या प्रकरणी दिनांक २४ मार्च,२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

या आदेशातील ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत :-

१. आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता रु.२०७०.६० कोटी इतकी एकूण महसुली गरज निश्चित केली आणि तात्पुरत्या अचूक समायोजनावर आधारीतआर्थिक वर्ष २००९-१० मधील विविध बाबींकरिता रु.१३४१.५० कोटी.

२. आयोगाने सन २०१० करिता सुधारीत वीज दरासह रु.२१०७ कोटी इतका महसूल मान्य केला. याचिकाकर्त्याने निव्वळ तत्वावर केलेल्या अंदाजापेक्षा जास्त एकूण महसुली गरज आर्थिक वर्ष २०१०-११ करिता मंजूर करण्यात आली. तथापी, येथे वेगवेगळया शीर्षकाखाली करण्यात आलेल्या बदलांची नोंद घेणे महत्वाचे आहे. हे बदल खालील प्रमाणे आहेत.

   अ) संचालन व देखभाल खर्चाची विविध शीर्षके ही विक्रीशी निगडीत असलेल्या निकषावर आधारीत असल्यामुळे, संचालन व देखभाल खर्चात करण्यात आलेली कपात.

   ब) आर्थिक वर्ष २००९-१० मधील मंजूर भांडवली करणात कपात.

   क) भांडवलीकरणातील कपातीमुळे मत्ताशी संबंधित खर्चात कपात.

   ड) आर्थिक वर्ष २००९-१० करिता मान्यता दिलेल्या प्राप्ती-करात कपात.

   इ) वीज खरेदीच्या परिमाणात आणि बाहय स्त्रोतांकडील वीज खरेदीच्या खर्चात वाढ.

   फ) स्टॅण्ड-बाय आकार आणि आकारांमध्ये वाढ.

   ग) स्थानांतर विक्रीतील वाढीमुळे वीजेच्या विक्रींपासूनच्या महसूलात वाढ.

३. टीपीसी-वितरणच्या ग्राहकांकरिता वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च प्रति युनिट रु. ५.२० आहे आणि एकूण वीज दरापैकी वीज खरेदीवरील खर्च ८६.११ %, पारेषण व राज्य भार प्रेषण केंद्राचे आकार ३.७० % असून उरलेला भाग हा वितरण हानीसह वितरण खर्चाचा आहे.

४.आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीज दर निश्चितीकरण्यामागची तत्वे : टीपीसी-वितरणच्या सरासरी वीज दरात १५ % वाढ झाली असून निवासी वर्गवारीमध्ये

० ते १०० युनिट्स आणि १०१ ते ३०० युनिट्स विजेचा मासिक वापर असलेल्या वीज दरात अनुक्रमे १९ % आणि ७ % इतकी कपात झाली आहे.

५. आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता लागू असलेले वीज दर उच्च दाब जाळ्याला जोडलेल्या ग्राहकांकरिता प्रति युनिट रु. ०.१९ इतके आणि लघु दाब जाळ्याला जोडलेल्या ग्राहकांकरिता प्रति युनिट रु.०.३८ इतके निश्चित केले.

## आर्थिक वर्ष २००८-०९ करिता अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० करिता वार्षिक कामगिरीचा आढावा, आर्थिक वर्ष २०१०-११ करिता वीज दराच्या निश्चितीकरणासाठी महावितरण कंपनीची याचिका

आयोगाने सन २००९ च्या प्रकरण क्र. १११ मधील १२ सप्टेंबर, २०१० च्या आदेशाने महावितरण कंपनीचा आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेतला तसेच आर्थिक वर्ष २०१०-११ चा महावितरण कंपनीचा १ सप्टेंबर, २०१० पासून लागू होणारा वीज दर निश्चित केला. आयोगाने महानिर्मिती कंपनी, महापारेषण कंपनी आणि महावितरण कंपनी यांच्याकरिता अमरावती, नागपूर, नाशिक, पुणे, औरंगाबाद आणि नवी मुंबई येथे १४ मे २०१० ते २२ मे २०१० या कालावधीत एकत्रित जाहीर सुनावण्या आयोजित केल्या.

वीज दरातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:-

१. आयोगाने महावितरण कंपनीकरिता आर्थिक वर्ष २००९-१० साठी वीज दरातून वसूल करावयाची एकूण महसुली गरज रु. २७७१६ कोटी निश्चित केली, जी महावितरण कंपनीने प्रस्तावित केलेल्या रकमेपेक्षा कमी आहे.

२. आयोगाने निश्चित केलेली आर्थिक वर्ष २०१०-११ करिता एकूण महसुली गरज ही रु. ३०१९६ कोटी इतकी आहे. आर्थिक वर्ष २०१०-११ करिता एकूण महसुली गरज ही महावितरण कंपनीने प्रस्तावित केलेल्या रकमेपेक्षा कमी असून त्या संबंधीची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

अ) आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता विचारात घेतलेली वार्षिक हानि कमी असल्यामुळे, कमी वीज खरेदी करावी लागल्यामुळे वीज खरेदीवरील खर्चात कपात झाली.

ब) पारेषण दरामध्ये घट झाल्यामुळे महावितरण कंपनीने अदा करावयाच्या पारेषण दरात कपात झाली.

क) आयोगाने कर्मचाऱ्यांवरील खर्च, प्रशासकीय आणि सर्वसाधारण खर्च आणि नुतनीकरण आणि आधुनिकीकरणावरील खर्च, यासारखे नियंत्रणाधीन असणारे, प्रमाणानुसार तत्वावर मंजूर करण्याचे ठरविल्यामुळे, संचालन व देखभाल खर्चात झालेली कपात.

ड) प्रस्तावित भांडवलीकरणात कपात केल्यामुळे परिणामी देय व्याजावरील खर्च, घसारा, अन्य व्याज आणि निधी उभारणीवरील आकार आणि भाग भांडवलावर परतावा यामध्ये झालेली कपात.

इ) महावितरण कंपनीने झेडएलएस दरम्यान होणारी विक्री वजा न करता, महसुलाची परिगणना करण्यासाठी, संपूर्ण विक्री विचारात घेतली, त्यामुळे विजेच्या विक्रीपासून मिळणारा महसूल जास्त दाखविण्यात आला.

३. नियामक दायित्व आकारांचा (आरएलसी) परतावा

अ) आयोगाने ज्या ग्राहक वर्गवारीपासून नियामक दायित्व आकार प्राप्त झाले त्या संपूर्ण वर्गवारीकरिता विचार न घेता प्रत्येक प्रकरणनिहाय असा, आर्थिक वर्ष २०१०-११ करिता रु. ५०० कोटींचा नियामक दायित्व आकारांचा परतावा विचारात घेतला.

ब) नियामक दायित्व आकारांचा परतावा हा, वापरलेल्या प्रति युनिटकरिता सुट्ट्या पैशांच्या स्वरुपात न करता तो प्रति महिना वापरलेल्या युनिटसाठी पूर्ण रुपयात करण्यात येईल: ज्यामुळे ग्राहक, त्यांचा वापर कितीही असला तरी, दर महिना एक ठराविक रक्कम मिळण्यास पात्र राहतील.

४. आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीज दर निश्चितीकरण्यामागची तत्वे :

अ) आयोगाने लघु-दाब-दोन (ए) खाली दोन उप-वर्गवारी निर्माण केल्या : लघुदाब-बिगर निवासी किंवा वाणिज्यिक खालीलप्रमाणे :

१) लघु-दाब-दोन (ए) (१)- शैक्षणिक संस्था, इस्पितळे आणि दवाखाने २० किलोवॉट पर्यंतच्या भारासाठी

२) लघु-दाब-दोन (ए) (२)- अन्य ज्यामध्ये अन्य २० किलो वॉट पर्यन्तच्या भारासाठी बिगर निवासी आणि वाणिज्यिक ग्राहकांचा समावेश होतो.

ब) आयोगाने लघु-दाब-४ या वर्गवारी खाली २ उप-वर्गवारी निर्माण केल्या : लघुदाब -(मीटर शिवायचा वीज दर) खालील प्रमाणे :

१) ०-५ अश्वशक्ती

२) ५ अश्वशक्तीच्या वरील .

क) आयोगाने उच्च दाब-दोन : वाणिज्यिक वर्गवारी खाली देखील २ उप वर्गवारी निर्माण केल्या खालीलप्रमाणे :

१) उच्च दाब-दोन : वाणिज्यिक (समर्पित फीडरर्स )

२) उच्च दाब-दोन : वाणिज्यिक (साधारण फीडरर्स)- उच्च-दाब औद्योगिक आणि उच्च दाब सार्वजनिक पाणी कामे वर्गवारी मधील तत्वांप्रमाणेच. उच्च दाब-दोन: वाणिज्यिक (समर्पित फीडरर्स ) मधील ग्राहकांना भार नियमन लागू नसल्यामुळे त्यांना उच्च वीज दर लागू असेल. त्याशिवाय, आणखी वर्गवारी खालीलप्रमाणे निर्माण करण्यात आल्या आहेत.

- उच्च दाब-दोन : वाणिज्यिक (समर्पित फीडरर्स )
  - शैक्षणिक संस्था आणि इस्पितळे
  - अन्य
- उच्च दाब-दोन : वाणिज्यिक (साधारण फीडरर्स)-
  - शैक्षणिक संस्था आणि इस्पितळे
  - अन्य

५) महावितरण कंपनीच्या सरासरी वीज दरामध्ये ३% वाढ झाली आणि महावितरणच्या ग्राहकांकरिता वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च प्रति युनिट रु. ४.३८ होता.

## आर्थिक वर्ष २००८-०९ करिता अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० करिता वार्षिक कामगिरीचा आढावा, आर्थिक वर्ष २०१०-११ करिता एकूण महसूली गरज आणि वीज दराच्या निश्चितीकरणासाठी बेस्ट उपक्रमाची याचिका

आयोगाने सन २००८ च्या प्रकरण क्र. ९५ मधील १२ सप्टेंबर, २०१० च्या आदेशाने बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) चा आर्थिक

वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेतला तसेच आर्थिक वर्ष २०१०-११ करिता, १ सप्टेंबर, २०१० पासून लागू होणारा वीज दर निश्चित केला. आयोगाने बेस्ट उपक्रमाकरिता दिनांक १३ एप्रिल,२०१० रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली.

वीज दराची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१. आयोगाने आर्थिक वर्ष २००९-१० मधील विविध बाबींच्या तात्पुरत्या अचूक समायोजनावर आधारीत बेस्टची आर्थिक वर्ष २००९-१० करिता एकूण महसुली गरज रु.२८९६.४५ कोटी इतकी निश्चित केली.

२. आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता एकूण महसुली गरज रु.२५२६.२७ कोटी मंजूर केली.

३. एकूण महसूली गरज कमी मंजूर करण्यामागची मुख्य कारणे खालील प्रमाणे आहेत :

अ) तात्पुरते अचूक समायोजन केल्यानंतर,आर्थिक वर्ष २००९-१० करिता महसूलातील त्रुटीमध्ये कपात

ब) बेस्टने वितरण हानी १०% विचारात घेतली तरी आयोगाने वितरण हानी ९.५% इतकी कमी विचारात घेतल्यामुळे वीज खरेदी वरील खर्चात कपात. आर्थिक वर्ष २००९-१० करिता प्रत्यक्ष वितरण हानि ९.५% पेक्षा यापूर्वीच कमी असल्यामुळे या बदलामुळे बेस्टवर कोणताही परिणाम होणार नाही.

क) टिपीसी-निर्मिता कडून अतिरिक्त वीज खरेदी करण्यात येत असल्यामुळे वीज खरेदीवरील खर्चात कपात आणि महाराष्ट्र राज्यात प्रचलित संतुलन आणि हिशोब पूर्ण करण्याच्या पध्दतीच्या माध्यमातून विक्री करावयाच्या विजेत वाढ झाल्यामुळे त्याचा बेस्टवर कोणताही परिणाम होणार नाही.

ड) दिर्घकालीन कर्जे भांडवली खर्चातून ग्राहकांची वर्गणी आणि अनुदान वजा केल्यानंतर उरलेल्या भांडवली खर्चाच्या फक्त ७०% इतका भांडवली खर्च विचारात घेण्यात आल्यामुळे दिर्घकालीन कर्जावर द्यावयाच्या व्याजाच्या रक्कमेत कपात झाल्यामुळे त्याचा बेस्टवर कोणताही परिणाम झाला नाही.

इ) भाग भांडवलात कोणतीही भर न घालता अतिरिक्त भांडवली करण ग्राहकांची वर्गणी, अनुदान आणि कर्जामधून करण्यात आल्याने,भाग भांडवलावरील परताव्यामध्ये कपात झाल्यामुळे त्याचा बेस्टवर कोणताही परिणाम झाला नाही.

फ) बेस्टने अंदाजित केलेल्या आणि आयोगाने मंजूर केलेल्या संचालन व देखभाल खर्चाच्या रक्कमांमध्ये फरक .

ग) बेस्टने विद्यमान वीज दरापासून मिळणाऱ्या महसुलाची परिगणना करताना काही चुका केल्यामुळे आणि आयोगाने अधिक विक्री विचारात घेतल्यामुळे, बेस्टने अंदाजित केलेल्या महसुलापेक्षा विद्यमान वीज दरापासून आयोगाने परिगणना केल्याप्रमाणे मिळणारा महसूल खूप जास्त आहे.

४. बेस्टने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता वीज खरेदीसाठी प्रस्तावित केलेला प्रति युनिट खर्च जरी रु.४.४१ असला तरी आयोगाने वीज खरेदीवरील खर्च प्रति युनिट रु.४.१० मंजूर केला

५. बेस्टने त्यांच्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या याचिकेत सरासरी वीज दरामध्ये जरी ६.२१ % इतकी वाढ प्रस्तावित केली असली तरी बेस्टने सरासरी वीज दरामध्ये १५% कपात केली.

६. बेस्टने आर्थिक वर्ष २०१० करिता वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च जरी प्रति युनिट रु.६.८८ इतका प्रस्तावित केला असला तरी आयोगाने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च प्रति युनिट रु. ५.७५ इतका मंजूर केला.

## वीज खरेदी

### आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा (मार्ग-१) मध्यम कालीन तत्वावर २००० (+२०%) मेगावॉट वीज प्राप्त करण्यांसाठी फारकतींना मंजूरी मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ची याचिका

आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा (मार्ग-१) मध्यमकालीन तत्वावर २००० (+२०%) मेगावॉट वीज प्राप्त करण्यांसाठी फारकतीना १ डिसेंबर,२०१०च्या आदेशाने सन २०१० च्या २००८क्र.६३ च्या प्रकरणात आयोगाने मंजूरी दिली. करार कालावधीच्या बदलाबाबत, निश्चित तत्वावर बोली स्विकारणे, आणि प्रत्येक करार वर्षाकरीता बोलीचे मूल्यमापन स्वतंत्रपणे करणे याकरिता आयोगाने फारकतीना मान्यता दिली. आवश्यक वीज वहन पध्दती राज्य पारेषण कंपनीच्या इंटरफेस पर्यन्त नेण्याची व्यवस्था करण्याबाबत बोलीदारांवरील जबाबदारीला आयोगाने मान्यता दिली आणि निर्देश दिले की, वीज वहन पध्दतीत अंतर्भूत असलेला रास्तपणा आणि पारदर्शकतेच्या कलमांची पूर्तता करण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. ने ताठरपणाची भूमिका टाळावी.

### आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा (मार्ग-१) मध्यम कालीन तत्वावर १००० (+२०%) मेगावॉट आधार भार वीज प्राप्त करण्यासाठी स्पर्धात्मक प्रक्रियेकरीता (मार्ग-१) विद्युत मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रमाण बोली दस्तऐवजांपासून बोलीदारांना निर्गमित केलेल्या बोली दस्तऐवजांच्या प्रस्तावात घेतलेल्या फारकती, मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ची याचिका

आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा (मार्ग-१) मध्यम-कालीन तत्वावर १००० (+२०%) मेगावॉट वीज प्राप्त करण्यांसाठी, विद्युत मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रमाण बोली दस्तऐवजांपासून, बोलीदारांना निर्गमित केलेल्या बोली दस्तऐवजांच्या प्रस्तावात घेतलेल्या फारकतीना महावितरण कंपनीने सन २०१० च्या क्र.१०४ च्या प्रकरणात दिनांक १३ एप्रिल,२०१० रोजी मंजुरी दिली. महावितरण कंपनीने २०१२-१३ पर्यंतच्या वर्षाकरिता केलेल्या अंदाजावर आधारित, टप्पा-२ करीता मागणी-पुरवठा यातील तूट कमी करण्यासाठी मार्ग-१ खाली २६०० मेगावॉट बोली प्रक्रिया महावितरण कंपनीने पक्की केली. वर्तवलेल्या अंदाजात २०११-१२ या वर्षामध्ये साधारणपणे २८५५ मेगावॉट विजेचा तुटवडा दिसला. एमपीजीसीसी चे आणि केंद्र-क्षेत्रातील प्रकल्प वेळापत्रकानुसार बहुतेक येणार नाहीत. व त्यांना एक किंवा दोन वर्ष विलंब होऊ शकतो. या विलंबामुळे मागणी-पुरवठा यातील दर वाढू शकते. ही दरी कमी करण्यांसाठी महावितरण कंपनीने मध्यम-कालावधीच्या तत्वावर (जानेवारी २०११ ते डिसेंबर २०१२) १००० मेगावॉट वीज प्राप्त करण्याचे प्रस्तावित केले आहे.

मार्ग-१ बोलीकरिता, मुख्यत: वीज प्राप्त करणाऱ्यांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्याकरीता, विद्युत मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रमाण बोली दस्तऐवजांमध्ये काही सुधारणा केल्या आहेत. या सुधारणा मुख्यत: अनुक्रमांक ६ च्या सबंधी होत्या : वेळापत्रकानुसार पाठवणीची तारीख : सुधारणांमध्ये प्रस्तावित केले की, केंद्र/ राज्य सरकार कंपनी (उपक्रम) (दुवा जोडणे) बरोबर केलेल्या कोळसा (इंधन) पुरवठा कराराच्या संबंधात कलम ४.१३ (ब) खाली विनिर्दिष्ट केलेल्या इंधन स्त्रोताच्या तरतुदींमध्ये भर टाकणे आणि प्रत्येक वित्तिय बोलीकरिता प्रत्येक वित्तीय बोली खाली तदनुरुप प्रस्तुत केलेल्या करार-क्षमतेच्या संदर्भात अधिक संख्येने वित्तीय बोली सादर करतील अशा बोलीदारांनी अलग बोली बंधपत्र सादर करावे, आणि अन्य फारकती, आयोगाने निरिक्षण नोंदविले की, याचिकाकर्त्यांने प्रस्तावित केलेल्या तफावतीमुळे मागणी-पुरवठा यातील दरीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यांसाठी याचिकाकर्त्याला अधिक लवचिकता प्राप्त होईल. म्हणून आयोग प्रस्तावित फारकतीना मान्यता देत आहे.

### मार्ग-१ खाली आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा मध्यम-कालीन तत्वावर अगोदर मंजूरी दिलेल्या १००० (± २०%) मेगावॅट आधार भार विजेच्या ऐवजी २०००(± २०%) मेगावॅट विजेच्या प्राप्तीकरिता महावितरण कंपनीची मंजूरी साठी याचिका

जानेवारी २०११ ते डिसेंबर २०१२ या कालावधीकरिता मध्यम-बोली तत्वावर २००० (±२०%) मेगावॅट आधार भार वीज प्राप्त करण्यांसाठी भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने निर्गमित केलेल्या स्पर्धात्मक मार्गदर्शिकेखाली (मार्ग-१) महावितरण कंपनीने वीज प्राप्त करण्यांसाठी निर्णय घेतला. सन २००९ च्या क्रमांक १०४ च्या प्रकरणात दिनांक १३ एप्रिल,२०१०च्या आदेशाने मध्यम-कालीन तत्वावर अगोदर मंजूरी दिलेल्या १०००मेगावॅट आधार भार विजेच्या ऐवजी आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेखाली (मार्ग-१) मध्यम-कालीन तत्वावर २०००(±२०%) मेगावॅट आधार भार वीज प्राप्त व्हावी म्हणून स्पर्धात्मक बोली प्रक्रियेकरीता विद्युत मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रमाण बोली दस्तऐवजांपासून, बोलीदारांना निर्गमित केलेल्या बोली दस्तऐवजांच्या प्रस्तावात घेतलेल्या फारकती आयोगाने मंजूर केल्या. सुधारित कलम क्रमांक १.३.१ च्या बाबतीत म्हणजेच व्याप्ती: अनुक्रमांक ६ म्हणजेच २००० मेगावॅट पेक्षा कमी मागणी क्षमतेसाठी प्राप्तकर्त्याने /प्राधिकृत अधिकाऱ्याने निश्चित केलेली वेळापत्रकीय पाठवणी तारीख-आयोगाने मंजूर केलेल्या प्रस्तावात एकल फारकतीसाठी महावितरण कंपनीने आयोगाला विनंती केली.

आयोगाने ८ सप्टेंबर,२०१० च्या आदेशान्वये मत प्रदर्शित केले की, महावितरण कंपनीने त्यांच्या अंदाजित /संकल्पित मागण्यांसाठी उपयोगात आणलेल्या अशास्त्रिय कार्यपध्दतीवर आणि अदमासांवर/गृहितकांवर मुळीच समाधानी नाही आणि भार अंदाजाबाबत उपयोगात आणणाऱ्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यांसाठी महावितरण कंपनीला आदेश दिला तसेच कलम क्रमांक १.३.१ व्याप्ती : अनुक्रमांक ६ च्या बाबतीत दस्तऐवजांच्या प्रस्तावातील फारकतीकरिता मंजुरी दिली.

### महाराष्ट्र विद्युत नियामक (वीज दराच्या अटी व शर्ती) चे विनियम,२००५ सह विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम ८६ (१) (बी) अंतर्गत बेस्ट आणि टाटा पॉवर कं. निर्मिती यांच्यात वीज खरेदी कराराला मंजूरी मिळण्यासाठी बेस्ट ची याचिका

सन २०१०च्या क्रमांक १ च्या प्रकरणात आयोगाने १ सप्टेंबर २०१० च्या आदेशाने बेस्ट आणि टाटा पॉवर कंपनी निर्मिती यांच्यातील अतिरिक्त १०० मेगावॅट वीजेसाठी वीज खरेदी कराराला मान्यता दिली. बेस्टने सादर केले की रास्त किंमतीत ही तूट भरुन काढण्यासाठी अखंडित वीज प्राप्त व्हावी म्हणून दिनांक ५ फेब्रुवारी,२०१० रोजी बेस्टने, त्याची तातडीची गरज भागविण्यांसाठी टाटा पॉवर कंपनी निर्मिती या कंपनीबरोबर अतिरिक्त १०० मेगावॅट वीज प्राप्त व्हावी म्हणून १ एप्रिल,२०१० पासून लागू होणारा वीज खरेदी करार केला. बेस्टने पुढे सांगितले की आर्थिक वर्ष २००९-१० करीता वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या बेस्टच्या याचिकेत बेस्टने आपला वरील हेतू आयोगाला कळविला होता.

बेस्टने सादर केले की उपलब्ध होणाऱ्या या १०० मेगावॅट विजेमुळे सध्याची वीज तुटवड्याची समस्या बेस्टला दूर करता येईल. ज्यामुळे ग्राहकांवरील बाहेरुन वीज खरेदी करण्यासाठी येणारा जादा आर्थिक बोजा कमी होईल तसेच मुंबई शहराला अखंडित वीज पुरवठा होऊ शकेल. बेस्टने दाखल केलेल्या सन २०१० च्या क्रमांक १ च्या प्रकरणातील याचिकेवर चालविण्यात येणाऱ्या कामकाजात सहभागी होण्यांसाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने आयोगाला विनंती केली आणि आयोगाने ही विनंती मान्य केली.

बेस्टने सादर केले की आर्थिक वर्ष २०१०-११ करिता बेस्टची गरज पारेषण ते वितरण इंटरफेसला ९०० मेगावॅट इतकी आधीच पोचली आहे जी निर्मिती टर्मिनसला ९९० मेगावॅट इतकी रुपांतरीत होते. बेस्टने सादर केले की १०० मेगावॅटचा वीज खरेदी करार जरी केला असला तरी सुध्दा त्यांना ६० मेगावॅट इतका अधिक तुटवडा भासणार आहे. आर्थिक वर्ष २००९-१० पेक्षा आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये बेस्टची विजेची मागणी ४.१३ टक्क्यांनी आणि १०.१६ टक्क्यांनी वाढली, उलटपक्षी आर्थिक वर्ष २००९-१० च्या अनुक्रमे एप्रिल आणि मे महिन्यांच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये पारेषण ते वितरण इंटरफेस मधून उर्जेची ५.१५ टक्क्यांनी आणि ८.२५ टक्क्यांनी वाढली.

सन २००६ च्या क्रमांक ८७ च्या प्रकरणात, सन २००६ च्या क्रमांक ८८ च्या प्रकरणांत आणि सन २००७ च्या क्रमांक ३० च्या प्रकरणात दिनांक ६ नोव्हेंबर,२००७ रोजी पूर्वी दिलेल्या आदेशाने टाटा पॉवर कंपनी निर्मिती आणि बेस्ट यांच्यात ८३२ मेगावॅटकरिता वीज खरेदी करार केला होता त्यात असलेली कलमे टाटा पॉवर कंपनी- निर्मिती आणि बेस्ट यांच्यात अतिरिक्त १०० मेगावॅट क्षमतेसाठी आयोगाने मंजूर केलेल्या प्रस्तावित वीज खरेदी करारासमान आहेत. १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०१८ या ८ वर्षांच्या कालावधीकरीता हा वीज खरेदी करार अंमलात राहील आणि तो पूर्वी मंजूर झालेल्या ८३२ मेगावॅट वीज खरेदी करारासोबत समाप्त होईल.

### आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेसाठी (मार्ग-१ टप्पा) दीर्घ-कालीन २००० मेगावॅट (-/२०%+३०%) वीज प्राप्त करण्यांसाठी वीज दर स्विकृत करण्यांसाठी महावितरण कंपनीची याचिका

सन २०१० च्या क्रमांक २२ च्या प्रकरणांत वीज खरेदी करारात काही निरिक्षणे नोंदविल्यानंतर दिनांक २८ डिसेंबर,२०१०च्या आदेशाने आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेखाली (मार्ग-१ टप्पा) दीर्घ-कालीन २००० मेगावॅट (-/२०%+३०%) वीज प्राप्त करण्यासाठी वीज दर स्विकृत करण्यासाठी आयोगाने मान्यता दिली आणि महावितरण कंपनीला निर्देशित केले की, त्यांनी आयोगाने नोंदविलेली निरिक्षणे समाविष्ट करुन मे. एमको एनर्जी लिमिटेड, मे अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड आणि मे. इंडिया बुल्स् पॉवर लिमिटेड बरोबर करण्यात आलेले

अंतिम वीज खरेदी करारनामे आयोगाला सादर करावीत. मे. एमको एनर्जी लिमिटेड कडून २०० मेगावॉटच्या वीजेसाठी रु.२.८७९ प्रति युनिटप्रमाणे लेव्हलाईज्ड वीज दराला, मे.इंडिया बुल्स् पॉवर लिमिटेड (अमरावती) कडून १२०० मेगावॉट वीजेसाठी रु.३.२६० प्रति युनिट प्रमाणे लेव्हलाईज्ड वीज दराला आणि मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड कडून १२०० मेगावॉट वीजेसाठी रु.३.२८० प्रति युनिट प्रमाणे लेव्हलाईज्ड वीज दराला स्विकृत करण्यासाठी आयोगाने तत्वत: मान्यता दिली.

## अन्य आदेश

### महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण कंपनी) ची प्रिपेड ऊर्जा मीटर्स बसविण्यासाठी मंजुरी घेण्याबाबत तसेच अन्य दिलासे मागण्यासाठी याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र.७६)

प्रिपेड ऊर्जा मीटर्स् बसविण्यासाठी मंजुरी घेण्याकरिता महावितरण कंपनीने दिनांक ३ डिसेंबर,२००९ रोजी आयोगासमोर याचिका दाखल केली होती. महावितरण कंपनीने या याचिकेद्वारे असे सादर केले की, प्रिपेड ऊर्जा मीटर्समुळे ग्राहकांना अधिक चांगली सेवा देता येऊ शकेल, याचिकाकर्त्यांना प्राप्त होणाऱ्या पैशाची आवक वाढेल. तसेच त्यामुळे ग्राहकांच्या गाऱ्हाण्यांमध्ये व असंतोषामध्ये घट होईल. प्रिपेड मीटर प्रणालीमध्ये ग्राहक पैशाचा भरणा आगाऊ करतात आणि अगोदरच्या महिन्यांत झालेल्या ऊर्जा वापरासाठी जमा रक्कम त्यातून वळती केली जाते. ग्राहकाने खरेदी केलेले सर्वच्या सर्व युनिटस् वापरले गेले तर वीज पुरवठा आपोआप खंडित होईल.

या प्रकरणावर दिनांक ७ जानेवारी, २०१० व १७ मार्च २०१० रोजी सुनावणी झाली व वीज दर आदेशान्वये आयोगाने पूर्वी दिलेल्या निर्देशानुसार प्रिपेड मीटर प्रणालीचा हा प्रस्ताव सुसंगत असल्यामुळे, आयोगाने योग्य त्या नियामक प्रक्रियेनंतर या संकल्पनेला दिनांक २६ एप्रिल,२०१० रोजीच्या आदेशान्वये मंजुरी दिली. याचिकाकर्त्याने प्रस्तावित केल्याप्रमाणे नमुना दाखल २५,००० प्रिपेड मीटर्सना आयोगाने मंजूरी दिली असून या प्रकल्पांतर्गत लघु-दाब एकल फेज निवासी ग्राहक, लघु-दाब वाणिज्यिक वर्गाचे ग्राहक व लघु-दाब अस्थायी वर्ग ग्राहक यांना अंतर्भूत करण्यासाठी निर्देशित केले. आयोगाने महावितरण कंपनीला निर्देश दिले की, ज्यांना वीज पुरवठा प्रिपेड मीटरद्वारा केला जाईल त्यांचेकडून सुरक्षा अनामत वसूल केली जाणार नाही.

आयोगाचा असा दृष्टिकोन होता की ही योजना मोठ्या प्रमाणात राबविण्यापूर्वी एक वर्ष या प्रणालीच्या अभ्यास करावा आणि प्राप्त अनुभवांवरील माहिती गोळा करुन होणारे लाभ निर्धारित केले जावेत. आयोगाने याचिकाकर्त्यांना निर्देश दिले की त्यांनी एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत पथदर्शक प्रिपेड मीटरींग योजनेवरील निष्कर्षाचा अहवाल सादर करावा.

### वसाहत धोरण/विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण/औद्योगिक धोरणांतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या क्षेत्राकरिता वितरण फ्रँचायसी आणि ठोक पुरवठा वीज दर यांच्या निवडीसाठी सामंजस्य करार मार्गाला तत्वत: मंजूरी द्यावी म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितची (महावितरण कंपनी) याचिका

वसाहत धोरण/ विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण/औद्योगिक धोरणांतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या क्षेत्राकरिता वितरण फ्रँचायसी आणि ठोक पुरवठा वीज दर यांच्या निवडीसाठी सामंजस्य करार मार्गाला तत्वत: मंजुरी द्यावी म्हणून महावितरण कंपनीने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ च्या ७ व्या परंतुकांतर्गत दिनांक २५ सप्टेंबर,२००९ रोजी प्रतिज्ञा पत्रकाद्वारे याचिका सादर केली. वितरण फ्रँचायसीची नेमणूक करण्यांसाठी सामंजस्य करार मार्गाला मंजुरी मिळावी म्हणून महावितरण कंपनीच्या याचिकेबाबत आयोगाचे असे मत होते की वितरण परवानाधारकाला योग्य वाटतील अशा अटी व शर्तीवर वितरण फ्रँचायसीची निवड करण्यांसाठी ते कोणतीही पध्दत अवलंबू शकतात आणि वितरण परवानाधारकाने अवलंबिलेल्या कार्यपध्दतीला किंवा निवडलेल्या व्यक्तिला/ पक्षकाराला मंजुरी देण्याची आयोगाला अधिकारिता नाही. तथापि संबंधितांनी अभिव्यक्त केल्याप्रमाणे, आयोगाचे असे मत होते की, खरे पाहता संपूर्ण पारदर्शकता आणि स्पर्धात्मकता असावी म्हणून स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा वितरण फ्रँचायसीची निवड आणि नियुक्ती करावी.

त्याशिवाय, महावितरण कंपनीने आयोगाला विनंती केली की त्यांनी फ्रँचायसीच्या क्षेत्रात मिश्रभार वितरीत करण्याकरिता वितरण फ्रँचायसीला एकाच ठिकाणी वीजपुरवठा केला जावा म्हणून ठोक पुरवठा वीज दराला मंजुरी द्यावी. महावितरण कंपनीने सुचविले की मिश्रभाराचा, उदा. निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक, इत्यादी, काही भाग गृहित धरुन वाढीव ठोक पुरवठा वीज दर निश्चित करावा. आयोगाने ठोक पुरवठा वीज दर निश्चित केला नाही कारण मिश्र वीज वापराच्या बाबतीत एका वितरण फ्रँचायसीचे दुसऱ्या वितरण फ्रँचायसीकरिता असलेला ठोक पुरवठा वीज दर त्यांच्या स्वत:च्या मिश्र वापराकरीता प्रतिबिंबित करावाच लागेल आणि आयोग, मिश्र वापराचे सर्व शक्य संयोग मांडण्यासाठी ठोक पुरवठा वीज दर निश्चित करु शकत नाही.

वितरण फ्रँचायसीची निवड करण्यांसाठी आणि सेझकरिता ठोक पुरवठा वीज दर निश्चित करण्यांसाठी सामंजस्य करार मार्गाला मंजुरी मिळावी म्हणून महावितरण कंपनीने आयोगाला विनंती केली. दिनांक २५ सप्टेंबर,२००९ रोजी सध्याची याचिका दाखल केल्यानंतर वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने दिनांक ३ मार्च,२०१० रोजी एक अधिसूचना काढली, ज्या अन्वये विद्युत अधिनियम २००३च्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत सेझचे विकासक हे वितरण परवानाधारक म्हणून समजले जातील. ही अट खालीलप्रमाणे आहे :-

''परंतु असे की विशेष आर्थिक क्षेत्र कायदा, २००५ च्या कलम ४ च्या उप-कलम(१) अंतर्गत विशेष आर्थिक क्षेत्राचा विकासक हा, या कलमाच्या प्रयोजनासाठी, अशा विशेष आर्थिक क्षेत्राच्या अधिसूचनेच्या तारखेपासून, परवानाधारक म्हणून मानला जाईल.''

सेझच्या विकासकाला, वितरण परवानाधारक करण्याचा महावितरण कंपनीचा प्रस्ताव वर उल्लेखलेल्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या दिनांक ३ मार्च,२०१० च्या अधिसूचनेशी सुसंगत नव्हता.

### प्रतिवादी क्र.१ महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने निर्गमित केलेल्या दिनांक १६ मे,२०१०, १८ मे,२०१०,१२ जून,२०१० आणि ३० जून २०१० रोजीच्या पत्राद्वारे अनुक्रमे १६०मेगावॉट आणि १०० मेगावॉट वीज पुरवठ्याचे वेळापत्रक फेटाळणाऱ्या पत्रांच्या वैधानिकतेवर आणि औचित्यावर आक्षेप घेणाऱ्या मे. टाटा पॉवर कंपनी लि. ची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र.३७)

प्रतिवादी क्र. १ महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने निर्गमित केलेल्या दिनांक १६ मे,२०१०, १८ मे, २०१०, १२ जून, २०१० आणि ३० जून, २०१० रोजीच्या

पत्राद्वारे अनुक्रमे १६० मेगावॉट आणि १०० मेगावॉट वीज पुरवठयाचे वेळापत्रक फेटाळणाऱ्या पत्रांच्या वैधानिकतेवर आणि औचित्यांवर मे.टाटा पॉवर कंपनी लिमिटेडने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य ग्रिड संहिता) विनियम,२००६ च्या विनियम ३५ सह विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम ८६ (१) (सी), ३३(४) आणि १४२ अंतर्गत दिनांक २० ऑगस्ट २०१० रोजी याचिका दाखल केली.

याप्रकरणी, महाराष्ट्र सरकारने गठीत केलेल्या ५ सदस्यीय समितीच्या अहवालासह एक ज्ञापन आयोगाकडे पाठविले ज्याद्वारे महाराष्ट्र सरकारने सुचविले की, जनतेच्या हिताच्या दृष्टीने ५ सदस्यीय समितीच्या अहवालावर विचार करुन आयोगाने योग्य ती उपाययोजना लवकरात लवकर करावी, नोंद करण्यासाठी प्रस्तुत करण्यात आलेल्या दस्तऐवजांची छाननी केल्यानंतर आयोगाचे असे मत झाले की, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने योग्य निर्णय घेतला होता, कारण महाराष्ट्र सरकारच्या दिनांक ७ मे,२०१० आणि १९ मे,२०१० रोजीच्या ज्ञापनांच्या अनुषंगाने जनतेच्या निकडीच्या असाधारण परिस्थितीत निर्णय घेण्याचा त्यांना हक्क होता.

आयोगाने दिनांक २९ सप्टेंबर, २०१० रोजीच्या आदेशान्वये म्हटले की, भारत सरकारने श्री. गिरीश बी प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली प्रणालीच्या परिचालनासाठी आणि वर्तुळाकार कुंपण भार प्रेषण केंद्राकरिता मनुष्यबळ, प्रणालीकरण आणि प्रोत्साहन या विषयांसाठी एक समिती गठीत केली होती, समितीच्या अहवालामध्ये कार्यात्मक स्वायत्तता आणि वर्तुळाकार कुंपण भार प्रेषण केंद्राच्या अधिकारांवर गंभीर चिंता व्यक्त केली होती आणि सुचविले होते की या केंद्रांनी त्यांच्या कृती भेदभावरहित, पारदर्शक असतील आणि बाजारातील व्यवयायिकांमुळे किंवा इतर व्यावसायिक कृतीने त्या प्रभावित होणार नाहीत याची खात्री करुन घ्यावी. शिवाय, संबंधित सरकारने आवश्यक उपाययोजना केल्या पाहिजेत जेणेकरुन विद्युत अधिनियम,२००३ आणि राष्ट्रीय विद्युत धोरणानुसार भार प्रेषण केंद्रांना स्वतंत्रपणे काम करणे सुकर होईल.

त्यामुळे आयोगाने सुचविले की महाराष्ट्र राज्यातील वीज क्षेत्राच्या लाभासाठी श्री.गिरीश प्रधान समितीने सुचविलेल्या शिफारशी त्वरित अंमलात आणाव्यात.

**वीज हानि आणि वीज निर्मितीमध्ये अडथळा आणणाऱ्या वितरण रोहित्राच्या दुरुस्ती पध्दतीबाबत निर्देश प्राप्त करण्यासाठी श्री. नाथू गंगाधर रंभाड यांची याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र.१७)**

वितरण रोहित्राचे उत्पादक आणि १९७६ सालापासून महावितरण कंपनीकरिता (पूर्वीचे महाराष्ट्र राज्य वीज मंडळ) वितरण रोहित्रांच्या दुरुस्तीचा अनुभव असलेले श्री. नाथू गंगाधर रंभाड यांनी त्यांच्या अनुभवाच्या बळावर आणि जनतेच्या हिताच्या दृष्टीकोनातून वीज हानि आणि वीज निर्मितीमध्ये अडथळा आणणाऱ्या महावितरण कंपनीने अवलंबलेल्या वितरण रोहित्राच्या चुकीच्या दुरुस्ती पध्दतीबाबत तसेच वीज क्षेत्रामध्ये महावितरण कंपनीचे कामकाज काटकसरीने कसे चालविता येईल याकरिता दिनांक ४ मे,२००९ रोजी याचिका दाखल केली होती.

याचिकेवरील सुनावणी दरम्यान आयोगाने लक्षात घेतले की केवळ कृती आराखड्याने ही समस्या सुटणार नाही. परंतु त्या पध्दतीवर कडक संनियंत्रण आणावे लागेल तरच ठोस प्रगती दिसून येईल. नियामक प्रक्रियेनंतर आयोगाने दिनांक २४ नोव्हेंबर,२०१० च्या आदेशान्वये निर्देश दिले. या आदेशाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत :-

(अ) तांत्रिक अर्हता असून महावितरण कंपनीने विनिर्दिष्टीत करण्याची गरज असून महावितरण कंपनीने बोलीच्या मूल्यमापन प्रक्रियेत याचा काटेकोरपणे पाठपुरावा केला पाहिजे.

(ब) नव्याने मागविलेल्या तसेच दुरुस्त केलेल्या वितरण रोहित्रांची पूर्व पोचवणी तपासणी (उत्पादकाच्या जागेवर टाईप चाचणी आणि नियमित चाचणी) तसेच उत्तर-पोचवणी नमुना चाचणी/तपासणी करणे

(क) दुरुस्त केलेल्या वितरण रोहित्रांकरिता महावितरण कंपनीने संनियंत्रण कार्यपध्दतीचा आराखडा तयार करावा.

(ड) आयोगाने निश्चित केलेल्या खालील उद्दिष्टानुसार महावितरण कंपनीने वितरण रोहित्राच्या अपयशाच्या प्रस्तावाचा तिमाही अहवाल सादर करणे.

| वर्ष | प्रत्यक्ष दर | उद्दीष्ट | | |
|---|---|---|---|---|
| | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| अपयश प्रमाणाची टक्केवारी | १३.४० | १२% | १०% | ८.५% |

(इ) महावितरण कंपनीने आयोगाला सादर केलेल्या ''कृती आराखडयाचे'' पालन करावे तसेच आगामी वार्षिक कामगिरीचा आढावा (एपीआर) / एकूण महसुलीची गरज (एआरआर) याचिके सोबत ''कृती केल्याचा अहवाल'' आयोगाला सादर करावा.

**सध्याच्या महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या २२० के व्ही उप केंद्रामार्फत याचिका कर्त्याच्या वरोरा येथील निर्मिती उपकेंद्रातून २७० मेगावॉट (दुसरा हप्ता) विजेचे वहन करण्याकरिता पारेषण क्षमता मंजूर व्हावी म्हणून मे.वर्धा पॉवर कंपनी लिमिटेडची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र.२८)**

सध्याच्या महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या २२० के.व्ही. उप-केंद्रामार्फत याचिका कर्त्याच्या वरोरा येथील निर्मिती उप-केंद्रातून २७० मेगावॉट ''कृती आराखडयाचे'' (दुसरा टप्पा) विजेचे वहन करण्याकरिता पारेषण क्षमता मंजूर व्हावी म्हणून मे. वर्धा पॉवर कंपनी लि. ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम, ३९ सह कलम ८६(१) (इ), (एक) आणि (के) अंतर्गत दिनांक ०९ जून, २०१० रोजी प्रतिज्ञापनाद्वारा याचिका सादर केली.

दिनांक १७ मार्च,२०११ च्या आदेशान्वये, राज्य पारेषण कंपनी, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड आणि राज्य भार प्रेषण केंद्राला, आयोगाने परस्पर सहमतीच्या अटीवर निर्देश दिले की, त्यांनी दिनांक १५ फेब्रुवारी,२०११ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र ग्रिडबरोबर सध्याच्या मे.वर्धा पॉवर कंपनी लि. च्या युनिट - ३ शिवाय युनिट - ४ मधून निर्मिती केलेल्या विजेचे वहन आणि संकलन (उपमहामंडळ) करावे. आयोगाने स्पष्ट केले की सर्व संबंधित पक्षकारांनी विद्युत अधिनियम, २००३ व त्या अंतर्गत असलेल्या नियम आणि विनियमानुसार ग्रीड बाबतची शिस्त पाळावी. या व्यतिरिक्त, आयोगाने, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडला निर्देश दिले की, त्यांनी नवीन ४००/२२० के व्ही वरोरा उपकेंद्राचे काम वेळापत्रकानुसार पूर्ण करावे.

**टाटा पॉवर कंपनी लिमिटेडला कमी लेखण्यासाठी आणि तिची प्रतिमा मलीन करण्यासाठी देयक पध्दतीचा दुरुपयोग केल्या प्रकरणी आणि रिलायन्स, इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आर-इन्फ्रा) ने त्यांच्या ग्राहकांना जारी केलेल्या वीज देयकांचा उघडउघड दुरुपयोग केल्याप्रकरणी मे. टाटा पॉवर कंपनी लिमिटेडची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र.५९)**

टाटा पॉवर कंपनी लि. ला कमी लेखण्यासाठी आणि तिची प्रतिमा मलीन करण्यांसाठी देयक पध्दतीचा दुरुपयोग केल्या प्रकरणी आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आर-इन्फ्रा) ने त्यांच्या ग्राहकांना जारी केलेल्या वीज देयकांचा उघडउघड दुरुपयोग केल्याप्रकरणी टाटा पॉवर कंपनी लिमिटेड ने कलम ८६(१) (एफ) अंतर्गत दिनांक २९ सप्टेंबर,२०१० रोजी प्रतिज्ञापत्राद्वारे ठपका ठेवणारी याचिका आयोगासमोर दाखल केली. आर-इन्फ्राने त्यांच्या ग्राहकांना दिलेल्या विद्युत देयकांमध्ये टाटा पॉवर कंपनी लिमिटेड विषयी कमी लेखणारे शेरे छापण्यापासून व पसरविण्यापासून परावृत करावे म्हणून याचना केली, अपमानास्पद विधाने जसे:-

''तुमच्या खर्चाने १२०० कोटी रुपये कमावण्याचा टाटा पॉवरचा मार्ग, अधिक माहितीसाठी या संकेत स्थळाला भेट द्या - डब्लूडब्लूडब्लू.आस्कमुंबई.कॉम'' आयोगाचे असे मत होते की अन्य वितरण परवानाधारक विरुध्द विजेच्या देयकामध्ये अशा प्रकारची विधाने किंवा शब्दप्रयोग असू नयेत जेण करुन ग्राहकांच्या मनात कलुषितपणा निर्माण होईल, खास करुन जेव्हा संसदेने विद्युत अधिनियम,२००३ अधिनियमित करुन ग्राहकांना त्यांच्या पसंतीच्या विविध मार्गाने वीज पुरवठा घेण्याची मुभा दिली आहे.

आयोगाने दिनांक ३१ मार्च,२०११ च्या आदेशान्वये निर्देश दिले की, कोणतीही, संस्था तिच्या वीज देयकाचा उपयोग तिच्या प्रतिस्पर्ध्येच्या विरोधात प्रचार करण्यांसाठी करणार नाही. प्रतिवादीला निर्देश देण्यात आले की त्यांनी त्यांच्या देयकामध्ये वादग्रस्त विधाने छापण्याचे बंद करण्याबाबत आयोगाच्या आदेशाची पूर्तता केली आहे या बद्दलचे प्रतिज्ञापत्र या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसांचे आंत सादर करावे.

**विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम १७(३) अन्वये धनकोंना पारेषण परवाना अभिहस्तांकित करण्यांसाठी मंजूरी मिळावी म्हणून मे.जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेडची याचिका (सन २००९ चे प्रकरण क्र.७७)**

दिनांक ८ फेब्रुवारी,२००९ च्या आयोगाच्या आदेशाने सन २००९च्या क्रमांक १ चा पारेषण परवाना मे. जयगड पॉवर ट्रान्सको लिमिटेडला मंजूर करण्यात आला होता. सदर परवाना धनकोंना अभिहस्तांकित करण्यासाठी मंजूरी मिळण्याकरिता विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १७ (३) अन्वये दिनांक ११ डिसेंबर,२००९ रोजी मे.जयगड पॉवर ट्रान्सको लिमिटेडने आयोगाला याचिका सादर केली. आयोगाने या प्रकरणी १२ जानेवारी, २०१० आणि १२ मार्च ,२०१० रोजी सुनावणी घेतली आणि ११ मे, २०१० रोजी आदेश पारित केला. आयोगाने मत प्रदर्शित केले की पारेषण प्रकल्प हे भांडवली प्रकल्प असल्यामुळे त्यांना मोठया प्रमाणांत भांडवलाची गरज असते. या प्रकल्पांना आर्थिक पुरवठा कर्जाव्दारे दिला जातो जे कर्ज प्रकल्पाला गहाण ठेऊन दिले जाते. म्हणून, पारेषण प्रकल्पाकरीता कर्जाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून परवानाधारकाला प्रकल्पाची मालमत्ता, प्रकल्पाची कागदपत्रे आणि प्रकल्पाचे परवाने तसेच मंजुऱ्यावर गहाण खत तयार करणें आवश्यक असते. सुरक्षा विश्वस्त कराराच्या अनुरोधाने, प्रकल्पासाठी गहाणखत नोंदवून सुरक्षा विश्वस्तांच्या नावे प्रकल्पाची मालमत्ता गहाण ठेवण्यांसाठी आयोगाने अर्जदाराला तत्वत: मान्यता दिली. तथापि, आयोगाने स्पष्ट केले की नामनिर्देशित व्यक्तींच्या नांवे हक्क प्रदान करण्यांसाठी आयोगाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज याचिकाकर्त्याला मंजूर केलेला पारेषण परवाना सुरक्षा विश्वस्तांच्या नामनिर्देशित व्यक्तीला अभिहस्तांकित करता येणार नाही.

**विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ८६ अन्वये निर्मिती कंपनीच्या समर्पित पारेषण वाहिनी टाकण्यासाठी पारेषण परवान्याची आवश्यकता नसण्याबद्दल मे.अभिजीत एम.ए.डी.सी. नागपूर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची स्पष्टीकरण मागण्यासाठी याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र.२ )**

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ अन्वये निर्मिती कंपनीव्दारा समर्पित पारेषण वाहिनी टाकण्यासाठी पारेषण परवान्याची आवश्यकता नसण्याबद्दल मे. अभिजीत एम.ए.डि.सी.नागपूर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची स्पष्टीकरण मागण्यासाठी याचिका मे.अभिजित एम.ए.डि.सी.नागपूर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने दिनांक २३ मार्च,२०१० रोजी आयोगाला याचिका सादर केली. दिनांक २३ जून,२०१० रोजी आयोगाने सुनावणी घेतली आणि दिनांक १० जुलै,२०१० रोजी आदेश काढला. आयोगाने मत प्रदर्शित केले की स्वनियंत्रित निर्मिती कारखाना स्थापन करणाऱ्या निर्मिती कंपनीला किंवा व्यक्तीला समर्पित पारेषण वाहिनी प्रस्थापित करण्यांसाठी, तिच्या परिचालनासाठी किंवा देखभालीसाठी विद्युत अधिनियम, २००३ अन्वये पारेषण परवाना घेण्यांची आवश्यकता नाही. परिणाम स्वरुप आयोगाने मत प्रदर्शित केले की, विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम ६८ अन्वये सचिव, (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,महाराष्ट्र शासन यांनी समर्पित पारेषण वाहिनी टाकण्यासाठी मे.अभिजीत एम्.ए.डी.सी.नागपूर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड अगोदरच मंजूरी दिली असल्यामुळे आयोग त्यामध्ये हस्तक्षेप करु शकत नाही. विद्युत अधिनियम, २००३च्या कलम १६४ अंतर्गत सचिव, (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,महाराष्ट्र शासन यांनी कोणताही निर्णय घेतल्यास किंवा आदेश दिल्यास किंवा सचिव, (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,महाराष्ट्र शासन यांनी कलम ६८ अंतर्गत कोणतीही मंजुरी दिल्यास त्यातील गुणदोषांमध्ये आयोग हस्तक्षेप करु शकत नाही. तसेच, विद्युत अधिनियम, २००३च्या कलम १६४ अंतर्गत उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,महाराष्ट्र शासन यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये आयोग हस्तक्षेप करु शकत नाही. विद्युत अधिनियम,२००३ ने दिलेल्या अधिकारितेनुसार तसेच केंद्र सरकारने तयार केलेल्या नियमांनुसार आणि विविध आदेशांनुसार, खास करुन विद्युत (अडचणींचे निरसन) पाचवा आदेश,२००५, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,महाराष्ट्र शासन, केवळ यावर निर्णय घेऊ शकतो.

**दिनांक १८ नोव्हेंबर,२०१० रोजी सायंकाळी ५.४० वाजता आणि दिनांक २१ नोव्हेंबर, २०१० रोजी सायंकाळी ५.०५ वाजता मुंबई यंत्रणेमध्ये अंशत: ग्रिड बिघाड (सन २०१० चे प्रकरण क्र.८४)**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज चालविणे), विनियम, २००४ च्या विनियम ३२ अन्वये, आयोगाने यंत्रणेत झालेल्या बिघाडाची प्राथमिक कारणें शोधून काढण्यांसाठी आणि त्यावर उपाययोजना करण्यांसाठी संबंधित पक्षकार आणि इतर संबधित संस्था /व्यक्ती ज्यामध्ये राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा यांचा समावेश आहे. यांची सुनावणी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१० रोजी घेतली.

त्यात असे वाटते की, विनियमाच्या तपासणी आणि सुनावणीमुळे यंत्रणेच्या अशा बिघाडाची प्राथमिक कारणे समजू शकतील आणि त्यावर उपाय योजना करण्यांसाठी मार्गदर्शिका तयार करता येईल. वरील दोन घटनांमुळे आयोगाने टाटा पॉवर कंपनी-पारेषण आणि आर.इन्फ्रा-पारेषण या कंपन्यांना निर्देश दिले की त्यांनी विविध पारेषण प्रकल्प गुंतवणूक योजना, कि ज्यांना आयोगाने अगोदरच मंजूरी दिली आहे, कार्यान्वित करण्यांच्या कामाला गती द्यावी. तसेच आयोगाने असे निर्देश दिले की दोन पारेषण परवानाधारकांच्या मध्ये सर्व आंतर-जोडण्यांच्या तोंडाशी तसेच पारेषण-वितरण आंतर-जोडणी सीमेच्या तोंडाशी असलेल्या संरक्षण मांडण्याचा आढावा घेण्यात यावा.

## ग्राहक आधार आणि गाऱ्हाणे निवारण यंत्रणा

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२(५) आणि ४२(६) नुसार राज्यात, वितरण परवानाधारकांनी स्थापन केलेल्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे (सीजीआरएफ), आणि आयोगाने नेमलेल्या विद्युत लोकपाल यांचे कामकाज प्रभावीपणे सुरु झालेले आहे. मंचाच्या एखाद्या सदस्यांचा कार्यकाल संपल्यानंतर २००७ मध्ये सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल विनियम), २००६ ला अनुसरुन मंचाच्या सदस्यांची पदे भरण्यात येतात. प्रत्येक ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचावरील ग्राहकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या एका सदस्यासाठी, आयोगाकडे इच्छुक व्यक्तींकडून आलेल्या अर्जापैकी जी व्यक्ती आयोगाने ठरवून दिलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करते अशा व्यक्तीचे नांव आयोगाकडून नामनिर्देशित करण्यात येते. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांचे सदस्य, विद्युत लोकपाल, ग्राहक प्रतिनिधी आणि वितरण परवानाधारक यांची वार्षिक बैठक मुंबई येथे २८ फेब्रुवारी, २०११ रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विविध ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांकडून करण्यात आलेल्या ग्राहकांच्या गाऱ्हाण्यांच्या निवारणासंबंधी आढावा घेण्यात आला आणि ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्याच्या संदर्भात चांगली सेवा देण्याचे मार्ग आणि पध्दती यावर चर्चा झाली.

आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये, राज्यातील ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचापुढे सुमारे ११३० बाधित ग्राहकांनी आपली गाऱ्हाणी मांडली त्यापैकी ८१३ गाऱ्हाण्यांचे निवारण करण्यात आले.

अहवाल वर्षात, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचच्या आदेशाने समाधान न झालेल्या, १६७ बाधित ग्राहकांनी विद्युत लोकपालाकडे अभिवेदने सादर केली, त्यापैकी १५८ प्रकरणी विद्युत लोकपाल यांनी आदेश पारित केले.

शिवाय, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच / विद्युत लोकपाल यांनी दिलेल्या आदेशांचे पालन न करणाऱ्या किंवा पालन करण्यात दिरंगाई करणाऱ्या वितरण परवानाधारकांच्या कृतीमुळे बाधित झालेल्या ३४ ग्राहकांनी अधिनियमातील संबंधित कलमाखाली आयोगाकडे याचिका दाखल केल्या.

उपरोक्त आकडेवारीवरुन, विद्युत ग्राहकांमध्ये त्यांचे हक्क आणि तक्रारी निवारण करणाऱ्या विविध व्यासपिठांच्या उपलब्धतेविषयी जागरुकता वाढीस लागत असल्याचे दिसून येते.

## विद्युत लोकपाल (इलेक्ट्रिसिटी ओम्बड्समन)

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ (६) अन्वये दि. २७ डिसेंबर, २००४ रोजी विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयाची स्थापना झाली आणि त्वरित कार्यान्वित करण्यात आले. त्या दिवासपासून, अधिनियमाच्या कलम ४२ (५) अन्वये या कार्यालयाकडे गाऱ्हाणी न सोडविली गेल्यामुळे बाधित झालेल्या ग्राहकांकडून निवेदने येण्यास सुरुवात झाली.

जानेवारी ते मार्च २००५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये, या कार्यालयाकडे, ५ निवेदने दाखल झाली होती. कालपरत्वे हळूहळू या निवेदनांचा ओघ वाढत गेला. २००५-०६ च्या आर्थिक वर्षात एकूण निवेदनांची संख्या ५८ पर्यंत वाढली. ग्राहकांच्या वाढत्या जागरुकतेबरोबर, पुढील आर्थिक वर्षात निवेदनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. सन २००६-०७ मध्ये मंचाने दिलेल्या आदेशाविरुद्ध ८४ निवेदने आली. ही संख्या सन २००८-०९ मध्ये ११० वर पोहोचली आणि सन २००९-१० वर्षात ही संख्या १५५ झाली.

अहवाल वर्षात १६७ निवेदने प्राप्त झाली, त्यापैकी १४० निवेदने याच वर्षात निकालात काढण्यात आली. त्याशिवाय, गेल्या वर्षी प्राप्त झालेली १८ निवेदने देखील या वर्षी निकालात काढण्यात आली. अशा रितीने, २००१०-११ मध्ये एकूण १५८ निवेदने निकालात काढण्यात आली आणि आदेश निर्गमित करण्यात आले.

ग्राहकांच्या निवेदनावर ६० दिवसांच्या आत निर्णय देण्यात यावा, अशी तरतूद महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक ग्राऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये आली आहे. या उलट, निवेदने निकालात काढण्यासाठी, सरासरी ४४ दिवसांचा कालावधी लागला आहे. विद्युत अधिनियम, २००३ मध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे, ग्राहक गाऱ्हाण्यांच्या त्वरित निवारणासाठी ही यंत्रणा खरोखरीच कार्यक्षम आणि अ-खर्चिक असल्याचे सिद्ध झाले आहे.

विद्युत लोकपाल यांना प्राप्त झालेल्या आणि त्यांनी निकाल दिलेल्या निवेदनांच्या विश्लेषणावरुन असे दिसून येते की, यापैकी बरीच निवेदने व्यापक वर्गवारीशी संबंधीत होती -जसे, देयकाशी सबंधीत वाद, सदोष मीटर, मीटरचे वाचन, मीटरची तपासणी, वीज पुरवठ्याचा खात्रीशीरपणा, सेवांशी संबंधीत, नवीन वीज जोडणी इ. काही वेळा, जागेच्या पूर्वीच्या मालकाच्या थकबाकीची वसुली, वीज पुरवठा खंडीत होणे, वीज पुरवठा / अतिरिक्त भार देण्यामधील विलंब, नवीन जोडणी / अतिरिक्त भार देण्यासाठी जादा आकारांची वसुली, काम चालू करताना पर्यायांविषयी माहिती न देणे, व्यत्यय, पूर्व-सूचनेशिवाय वीज पुरवठा खंडित करणे इ. मुद्देही ग्राहकांनी उपस्थित केले होते.

वाढत्या जागरुकतेबरोबर, ग्राहकांनी सेवेतील त्रुटी आणि सेवा पुरविताना निकषांची पालन करताना वितरण परवानाधारकांना आलेल्या अपयशाविषयी तक्रारी दाखल केल्या आणि विविध प्रकरणी नुकसान भरपाईचे दावे दाखल केले. अशा तऱ्हेच्या अनेक प्रकरणांबाबतही निकाल देण्यात आले, तसेच बऱ्याच प्रकरणात, सेवेतील त्रुटींसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकाची कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ ला अनुसरुन नुकसान भरपाई देण्याचे निकाल देण्यात आले.

विद्युत अधिनियमांतर्गत, विद्युत लोकपालांच्या कार्यालयाने, अधिनियमात अभिप्रेत असल्याप्रमाणे, ग्राहकांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण करण्यासाठी एक गतिमान, सुलभ व अ-खर्चिक कार्यक्षम पर्याय उपलब्ध करुन दिला आहे.

डॉ. सुरेश जोशी, निवृत्त आय.ए.एस. अधिकारी यांनी अहवाल वर्षात विद्युत लोकपाल हा पदभार मुंबई येथे स्वीकारला.

## परिशिष्ट - १

**२०१०-११ मध्ये आयोगासमोर दाखल झालेल्या याचिका**

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) | टाटा पॉवर कं. लि. (निर्मिती) | २९.०३.२०१० | २०१० चा १ | बेस्ट आणि टाटा पॉवर कंपनी लि. (निर्मिती व्यवसाय) यांच्यातील दि. ५ फेब्रुवारी २०१० रोजीच्या वीज खरेदी करारास मान्यता मिळविण्यासाठी याचिका |
| २ | मे.अभिजीत एमएडीसी नागपूर एजर्नी प्रा.लि. | सचिव (ऊर्जा) महाराष्ट्र शासन | २९.०३.२०१० | २०१० चा २ | निर्मिती कंपनीच्या समर्पित पारेषण वाहिन्या टाकण्यासाठी पारेषण परवान्याची गरज नसण्याबाबत स्पष्टीकरण मागण्यासाठी याचिका |
| ३ | पॉल स्ट्रीप्स ॲण्ड ट्युब्स् प्रा.लि. | महावितरण कंपनी | १२.०३.२०१० | २०१० चा ३ | सन २००९च्या प्रकरण क्र. १४७ मध्ये दि.४.२.२०१० रोजी विद्युत लोकपालांनी पारित केलेल्या आदेशाचे पालन केल्याबाबत याचिका |
| ४ | मुंद्रा स्टील ॲण्ड अलॉय प्रा.लि. | महावितरण कंपनी | १५.०३.२०१० | २०१० चा ४ | सन २००९ च्या प्रकरण क्र. १४७ मध्ये दि.४.२.२०१० रोजी विद्युत लोकपालांनी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत आणि आदेश पारित झाल्यानंतर एक महिन्याच्या आत वीज दरातील फरकाचा परतावा मिळण्याबाबत याचिका |
| ५ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | ३०.०३.२०१० | २०१० चा ५ | पेण शून्य भार नियमन मॉडेल चालू ठेवण्यासाठी परवानगी आणि विश्वासार्हता आकारांच्या वसुलीकरिता याचिका |
| ६ | मे. सनफ्रेश ॲग्रो प्रा.लि. | मुळा प्रवरा सहकारी विद्युत सोसायटी लि. आणि महावितरण कं. | ११.०९.२००९ | २०१० चा ६ | मुळा प्रवरा सोसायटी किंवा महवितरण या दोहोपैकी एकाकडून वीज पुरवठा घेण्यासाठी निर्देश मिळविण्यासाठी याचिका |
| ७ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (वितरण) | बेस्ट उपक्रम आणि टाटा पॉवर कं. लि. | २०.०४.२०१० | २०१० चा ७ | याचिकाकर्ता कंपनीच्या ग्राहक आणि त्याच्या आर्थिक वर्धनक्षमतेवर परिणाम करणाऱ्या काही गंभीर बाबींसंबंधी दिलासा मिळविण्यासाठी याचिका |
| ८ | टाटा पॉवर कंपनी लि. | उल्लेख नाही | ०३.०३.२०१० | २०१० चा ८ | २५० मेगावॉट युनिट क्र. ८ च्या भांडवली खर्च आणि वीज दराच्या निश्चितीकरणाच्या मंजुरी प्रकरणी १९.०१.२०१० च्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ९ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (वितरण) | उल्लेख नाही | २०.०४.२०१० | २०१० चा ९ | अंतिम संतुलन आणि हिशोबपूर्ती कार्यपध्दती (एफबीएसएम) सह विद्यमान अंतरिम अंतिम संतुलन आणि हिशोबपूर्ती कार्यपध्दती मध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका |
| १० | मे. ट्रेन्ट लि. | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर आणि टाटा पॉवर कंपनी लि. | १३.०४.२०१० | २०१० चा १० | विद्युत अधिनियम, २००३ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग पुरवठा संहिता यांचा प्रतिवादी १ कडून भंग आणि याचिकाकर्त्याच्या जागेत वीज पुरवठा खंडित न करुन याचिकाकर्त्यास अन्य परवानाधारका कडून वीज प्राप्त करण्यास हेतुपुरस्सर प्रतिबंध करणे आणि प्रतिवादी क्र. १ कडून खुप चढ्या किंमतीने वीज घेण्यास भाग पाडण्याविरोधात तक्रार |
| ११ | ट्रेन्ट हायपरमार्केट लि. | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर आणि टाटा पॉवर कंपनी लि. | १३.०४.२०१० | २०१० चा ११ | विद्युत अधिनियम, २००३ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग पुरवठा संहिता यांचा प्रतिवादी १ कडून भंग आणि याचिकाकर्त्याच्या जागेत वीज पुरवठा खंडित न करुन याचिकाकर्त्यास अन्य परवानाधारकाकडून वीज प्राप्त करण्यास हेतुपुरस्सर प्रतिबंध करणे आणि प्रतिवादी क्र. १ कडून खूप चढ्या किमतीने वीज घेण्यास भाग पाडण्याविरोधात तक्रार |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १२ | महाराष्ट्र इलेक्ट्रोस्मेल्ट लि. | महावितरण कंपनी | ०१.०४.२०१० | २०१० चा १२ | सन २००८ च्या प्रकरण क्र. ११६ मधील 'स्व-वापरासाठी विद्युत प्रकल्पाच्या ग्राहकांसाठीच्या देयकातील मागणीचे सन २००३ च्या प्रकरण क्र. ५५ आणि ५६ मधील स्व-वापरासाठीच्या विद्युत प्रकल्पाबाबतच्या आदेशानुसार नियमन करण्यात यावे' या खंडावर स्पष्टीकरण मागण्यासाठी याचिका |
| १३ | आयोग स्वत: | टाटा पॉवर कंपनी लि. आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | १७.५.२०१० | २०१० चा १३ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. ला त्याच्या ग्राहकांना वितरण करण्यासाठी टाटा पॉवर कंपनी लि. च्या निर्मिती केंद्रांकडून वीज पुरवठ्यसंबंधी आयोगाने स्वत: आयोजित केलेली सुनावणी |
| १४ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | १४.५.२०१० | २०१० चा १४ | आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेअंतर्गत (मार्ग -१) मध्यम-कालीन तत्वावर मान्यताप्राप्त १००० मेगावॉट बेस भार ऐवजी २००० (+/-२०%) मेगावॉटची खरेदी करण्यास परवानगी मिळण्यासाठी याचिका |
| १५ | टाटा पॉवर कंपनी लि. | मुंबई महानगरपालिका | १४.५.२०१० | २०१० चा १५ | उच्च दाब (विद्युत) वाहिन्या टाकण्यासाठी उत्खननाच्या हक्काच्या मंजुरीबाबतच्या वादासंबंधात याचिका |
| १६ | टाटा पॉवर कंपनी लि. | राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा, टाटा पॉवर ट्रेडिंग कंपनी लि, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. आणि बेस्ट उपक्रम | २०.५.२०१० | २०१० चा १६ | याचिकाकर्त्याच्या वितरण विभागाने मुंबई परवाना क्षेत्रातील त्याच्या ग्राहकांच्या भाराची गरज भागविण्यासाठी वीज खरेदी कराराच्या माध्यमातून करारबध्द् केलेली १६० मेगावॉट विजेचे काल-परिमाण नियोजन करण्यास (शेड्युलिंग) नकार देऊन संविधिक कर्तव्याचा भंग करुन त्यायोगे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने -१६.५.२०१० आणि १८.५.२०१० रोजी निर्गमित केलेल्या पत्राची वैधता आणि औचित्याचा भंग केल्याबाबत याचिका |
| १७ | श्री नाथु गंगाधर रंभाड | महावितरण कंपनी | ०३.०३.२०१० | २०१०चा १७ | ज्या रोहित्राचा दुरुस्तीनंतर किंवा बिघाडामुळे त्याच्या वाइंडिंग्सचा रंग काळा झाला आहे अशी रोहित्रे जादा भारामुळे सदोष झाली असल्याचे आणि त्यामुळे ती आदेशातील हमी-कालावधी संबंधीच्या खंडाच्या कक्षेत येत नसल्याचे घोषित करण्यासाठी प्रतिवादींना निर्देश देण्याकरिता याचिका |
| १८ | टाटा पॉवर कंपनी लि. | उल्लेख नाही | ४.०६.२०१० | २०१० चा १८ | आर्थिक वर्ष २००९-१० च्या चौथ्या तिमाहित अतिरिक्त वीज खरेदीस परवानगी मिळविण्यासाठी याचिका |
| १९ | शालीवाहन ग्रीन एनर्जी लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | २८.०४.२०१० | २०१० चा १९ | दि. ७ जून २००६ रोजी महावितरण कंपनीबरोबर केलेला बायोमास ऊर्जा खरेदी करार संपुष्टात आणण्याबाबत याचिका |
| २० | आयोग स्वत: | सर्व वितरण परवानाधारक आणि नूतनशील ऊर्जा उत्पादक | २३.०६.२०१० | २०१० चा २० | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चिती-करणाच्या अटी व शर्ती ) विनियम, २०१०च्या विनियम ८ अंतर्गत सामान्य वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका |
| २१ | आयोग स्वत: | सर्व वितरण परवानाधारक आणि नूतनशील ऊर्जा उत्पादक आणि महाराष्ट्र विद्युत विकास अभिकरण | १.०७.२०१० | २०१० चा २१ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० मध्ये सोपविलेली कामे पार पाडण्यासाठी राज्य अभिकरणास पदनिर्देशित करण्यासाठी याचिका |
| २२ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | २२.०६.२०१० | २०१० चा २२ | आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेअंतर्गत (मार्ग- १ टप्पा-२) दीर्घ-कालीन तत्वावर २००० मेगावॉट (-२०%/+३०%) वीज प्राप्त करण्यासाठी वीज दर स्वीकृतीसाठी याचिका |
| २३ | आयोग स्वत: | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | ३०.०६.२०१० | २०१० चा २३ | आयोगाने मान्यता दिलेल्या भार नियमनाच्या कार्यपध्दतीचे पालन न करण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड विरुध्द कारवाई सुरु करण्यासाठी आयोगाची स्वत:च्या पुढाकाराने सुनावणी |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| २४ | मे. यश ॲग्रो एनर्जी लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | २२.०६.२०१० | २०१० चा २४ | वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेशी थेट जोडलेल्या निर्मिती कंपनीने मुक्त प्रवेश नाकारण्यातून उद्‌भवलेल्या दाव्याच्या अभिनिर्णयासाठी याचिका |
| २५ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | ०१.०७.२०१० | २०१० चा २५ | गडचिरोली जिल्ह्यात भार नियमन मागे घेण्यासाठी याचिका |
| २६ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | १५.०६.२०१० | २०१० चा २६ | कळवा उप-विभागासहित ठाणे २ नागरी क्षेत्रामध्ये भार नियमन रद्द करण्यासाठी अतिरिक्त खर्च म्हणून विश्वासार्हता आकारांच्या निश्चितीकरणासाठी स्पष्टीकरण मागण्यासाठी याचिका |
| २७ | मे. प्रभात डेअरी प्रा. लि. | मुळा प्रवरा सहकारी विद्युत सोसायटी लि. आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | ०७.०७.२०१० | २००९ चा २७ | मुक्त प्रवेश पध्दतीखाली याचिकाकर्त्यास वीज पुरवठ्यासाठी आणि वितरण परवानाधारक (मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी) आणि महावितरण कंपनीने त्याची पूर्तता न केल्या प्रकरणी याचिका |
| २८ | वर्धा पॉवर कंपनी लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि. आणि इएमसीओ एनर्जी लि. | ०५.०६.२०१० | २०१० चा २८ | महापारेषण कंपनीच्या वरोरा येथील विद्यमान २२० केव्ही उप-केंद्रामधून याचिकाकर्त्याच्या वरोरा येथील निर्मिती उप-केंद्रातून २७० मेगावॉट (दुसरा टप्पा) विजेचे वहन करण्यासाठी पारेषण क्षमता हक्क मंजूर करण्याकरिता मे.वर्धा पॉवर कं.लि. यांची याचिका |
| २९ | वर्धा पॉवर कंपनी लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि. आणि राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा | ०५.०६.२०१० | २०१० चा २९ | महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी लि. चे पारेषण आकारांची मागणी करणारे दि. ३०.०३.२०१० चे पत्र रद्द करण्यासाठी याचिका |
| ३० | मुख्य विद्युत अभियंता, सेंट्रल रेल्वे, मुंबई | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | १८.०५.२०१० | २०१० चा ३० | महावितरण कंपनीने रेल्वे ट्रॅक्शनच्या देयकातून विश्वासार्हता आकारांची वसुली करणे थांबविण्यासाठी आणि व्याजासहित विश्वासार्हता आकारांचा परतावा करण्यासाठी निर्देश मागण्याकरिता याचिका |
| ३१ | सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. | उल्लेख नाही | १९.०७.२०१० | २०१० चा ३१ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ नुसार आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ नुसार खालील पारेषण यंत्रणा विकसित करण्यासाठी पारेषण परवान्याच्या मंजुरीकरिता याचिका - (अ) सिन्नर टीपीपी ते बाभळेश्वर उप-केंद्रादरम्यान ४०० केव्ही डी/सी क्वाड मूज पारेषण वाहिनी, (ब) बाभळेश्वर उप-केंद्रात दोन ४०० केव्ही वाहिन्या बेज |
| ३२ | अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एपीटीसीएल) | उल्लेख नाही | १९.०७.२०१० | २०१० चा ३२ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ नुसार पारेषण परवान्याच्या मंजुरीसाठी आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ नुसार खालील पारेषण यंत्रणेच्या विकासासाठी: याचिका - (अ) अमरावती औष्णिक विद्युत प्रकल्प ते अकोला उप-केंद्र पर्यन्त ४०० केव्ही डी /सी क्वाड मूज पारेषण वाहिनी (ब) अमरावती औष्णिक प्रकल्प येथे अकोला ते कोराडी लिलो ४०० केव्ही एस/सी पारेषण वाहिनी (क) महापारेषण अकोला उप-केंद्र येथे ४०० केव्ही वाहिनी २ बेज |
| ३३ | श्रीमती जुही विकास वर्तक | वरिष्ठ अभियंता, महावितरण, कल्याण विभाग | २२.०७.२०१० | २०१० चा ३३ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण परिमंडल, यांच्याकडे भरारी पथकाच्या वसुलीविषयी नोंदलेल्या गाऱ्हाणे क्र. २००९-२०१० चे के/इ/२१८/२४२ मध्ये पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबद्दल कारवाई करण्याबाबत याचिका |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | मे. जैन इरिगेशन सिस्टम लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | २०.०७.२०१० | २०१० चा ३४ | सन २००८ च्या प्रकरण क्र. ११६ मध्ये दि. १७.०८.२००९ रोजी आयोगाने पारित केलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ३५ | मे एनटीएस पॉवर | उल्लेख नाही | १६.०६.२०१० | २०१० चा ३५ | राज्यांतर्गत व्यापार परवान्याच्या मंजुरीसाठी याचिका |
| ३६ | टाटा पॉवर कंपनी लि. | उल्लेख नाही | ०६.०८.२०१० | २०१० चा ३६ | ३ मेगावॉट सौर ऊर्जेवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पाची ग्रिडशी जोडणीसाठी याचिका |
| ३७ | टाटा पॉवर कंपनी लि. | (१) महावितरण, (२) सचिव, महाराष्ट्र शासन, (३) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि., (४) बेस्ट उपक्रम, (५) पारेषण, आणि (६) टाटा पॉवर ट्रेडींग कं. | १८.०८.२०१० | २०१० चा ३७ | १६० मेगावॉट आणि १०० मेगावॉट विजेचे काल-परिमाण नियोजन (शेड्युल) करण्यास नकार देणाऱ्या प्रतिवादी क्र. १ - महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने दि. १६ मे २०१०, १८ मे २०१० आणि १२ जून २०१० आणि ३० जून २०१० रोजी निर्गमित केलेल्या पत्रात वैधता आणि औचित्याचा भंग केल्याबाबत याचिका |
| ३८ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | ०२.०८.२०१० | २०१० चा ३८ | महावितरण कंपनीसाठी काम करीत असलेल्या अभिकरणाच्या इच्छेनुसार त्रयस्थ पक्षाकडून वितरण रोहित्राच्या चाचणी प्रकरणी पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ३९ | फोर्ब्स अँण्ड कंपनी लि. | महाराष्ट्र विद्युत विकास अभिकरण (मेडा) | २३.०६.२०१० | २०१० चा ३९ | गॅसीफिकेशन मार्गाचा (ओटो सायकल ) वापर करुन महाराष्ट्र राज्यात बायोमासवर आधारीत विद्युत निर्मिती कंपनीकडून वितरण परवानाधारकाने करावयाच्या वीज खरेदीचा वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका |
| ४० | श्री विठ्ठल सिद्राम बुरुटे | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | २३.०८.२०१० | २०१० चा ४० | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल यांनी पारित केलेल्या आदेशाची पूर्तता न केल्याबाबत विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ अंतर्गत याचिका |
| ४१ | मे. नवलखा ट्रान्सलाईन्स | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | १८.०८.२०१० | २०१० चा ४१ | याचिकाकर्त्याच्या निर्मिती केंद्रामधून ग्राहकांना भेदभावरहित मुक्त प्रवेश देण्यासाठी महावितरण कंपनीला निर्देश आणि वादासंबंधात अभिनिर्णय करण्यासाठी याचिका |
| ४२ | कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया | उल्लेख नाही | ०७.०८.२०१० | २०१० चा ४२ | राज्यातील अर्हता नसलेल्या आणि आनुषंगिक प्रकारच्या ऊसाच्या चिपाडावर आधारित ग्रिडशी जोडलेल्या सहनिर्मिती प्रकल्पासाठी वीज दराचा आदेश आणि वीज दर रचनेच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ४३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. | उल्लेख नाही | २५.०८.२०१० | २०१० चा ४३ | मुक्त प्रवेश मंजूर झालेल्या ग्राहक आणि /किंवा व्यक्तिंकडून वसूल करावयाच्या वहन आकारावरील अतिरिक्त अधिभाराच्या निश्चितीकरणासाठी आणि क्रॉस सबसिडी अधिभाराच्या निश्चितीकरण प्रकरणी पुनर्विलोकन याचिका |
| ४४ | मे. इस्पात इंडस्ट्रीज लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. | ०७.०९.२०१० | २०१० चा ४४ | सन २००८ च्या अपील क्र. ७० आणि ११० मध्ये मा. विद्युत अपील न्यायाधिकरण यांनी दि. ५.८.२०१० रोजी दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीसाठी याचिका |
| ४५ | बृहन्मुबई इलेक्ट्रिक सप्लाय अँण्ड ट्रान्सपोर्ट अंडरटेकींग (बेस्ट) | उल्लेख नाही | ०१.०९.२०१० | २०१० चा ४५ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० मधील विनियम ७.२ आर्थिक वर्ष २०१०-११ करिता शिथिल करण्यासाठी याचिका |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | मुळा प्रवरा सहकारी विद्युत सोसायटी लि. | महावितरण कंपनी आणि सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा. लि. | १७.०८.२०१० | २०१० चा ४६ | मुक्त प्रवेशाच्या मंजुरी संबंधीच्या तरतुदींचे उल्लंघन केल्या प्रकरणी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४६ सह १४२ अंतर्गत याचिका |
| ४७ | मे. जेनिस टेक्सटाईल्स लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. | १७.०८.२०१० | २०१० चा ४७ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण यांनी दिलेल्या आदेशाचे महावितरण कंपनीने पालन न केल्याबाबत विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ अंतर्गत आयोगाचे निर्देश मागण्यासाठी याचिका |
| ४८ | मे. श्री स्टील कास्टिंग लि. | सुपरिटेंड अभियंता, नागपूर अर्बन सर्कल, महावितरण कं. | १७.०८.२०१० | २०१० चा ४८ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने दि. २०.३.२०१० रोजी दिलेल्या आदेशाची आणि दि. २६.३.२०१० आदेशाच्या शुध्दीपत्रकाची अंमलबजावणी विहित कालमर्यादेत न करण्याबाबत महावितरण कंपनीस दंड करण्यासाठी निर्देश मागण्याकरिता विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६, १५१ आणि १५१ ए अंतर्गत याचिका |
| ४९ | मे. निधी इंजिनिअरिंग कं. प्रा. लि. | सुपरिटेंड अभियंता, नागपूर अर्बन सर्कल, महावितरण कं. | १६.०८.२०१० | २०१० चा ४९ | विद्युत लोकपालांनी दि. ३०.६.२०१० रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी विहित कालमर्यादेत न करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याने महावितरण कंपनीस दंड करण्यासाठी निर्देश मागण्याकरिता विद्युत अधिनियम, २००३च्या कलम १४२,१४६, १५१ आणि १५१ ए अंतर्गत याचिका |
| ५० | मे. स्कीप पॅकिंग प्रा. लि. | सुपरिटेंड अभियंता, वसई सर्कल, महावितरण कं | २५.०५.२०१० | २०१० चा ५० | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण यांनी दि. ३१.८.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६ आणि ६२ (६) अंतर्गत याचिका |
| ५१ | मे. जे. डी. एक्सपोर्ट | विभागीय कार्यकारी संचालक, महावितरण, कल्याण आणि इतर | २२.०५.२०१० | २०१० चा ५१ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण, यांनी ११.५.२००९ रोजी दिलेल्या आदेशाचे महावितरण कंपनीने पालन न केल्याबाबत विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६ आणि ६२ (६) अंतर्गत आयोगाचे निर्देश मागण्यासाठी याचिका |
| ५२ | मे. आर. एल. स्टील लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | १७.०९.२०१० | २०१० चा ५२ | महावितरणने व्होल्टेज अधिभार लावण्याबाबत आणि त्याची अर्थनिश्चिती आणि अंमलबजावणी करण्यासंबंधीच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. ७१ मध्ये आयोगाने दि. ५.३.२०१० रोजी दिलेल्या आदेशातील निर्देशांविषयी स्पष्टीकरण मागण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ च्या ९२ आणि ९४ सह विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम १४२,१४६ आणि ६२ (६) अंतर्गत याचिका |
| ५३ | वर्धा पॉवर कंपनी लि. | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | २८.०९.२०१० | २०१० चा ५३ | मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने दीर्घ-कालीन तत्वावर वीज प्राप्त करण्यासाठी जुलै, २००९ मध्ये वीज दरावर आधारित स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा मार्ग - १ बोली पध्दती अंतर्गत निर्गमित केलेल्या विनंती प्रस्तावाबाबत (आरएफपी) निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वादासंबंधी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (बी) आणि (एफ) सह कलम ६३ अंतर्गत याचिका |
| ५४ | टाटा पॉवर कं. लि. | उल्लेख नाही | १७.०८.२०१० | २०१० चा ५४ | लोधीवली येथील डिझेल निर्मिती संचातून होणाऱ्या निर्मितिसाठी वीज दराच्या निश्चितीकरणावर स्पष्टीकरण मागण्यासाठी याचिका |
| ५५ | मे. यश ॲग्रो लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | ०८.०९.२०१० | २०१० चा ५५ | सन २००७ च्या प्रकरण क्र. ९३ मध्ये पारित केलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १० (२) अंतर्गत आणि दि. २५.१०.२००४ च्या ऊर्जा खरेदी कराराच्या अटींच्या संदर्भात प्रतिवादीस उचित निर्देश देण्यासाठी याचिका |
| ५६ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | २०.०९.२०१० | २०१० चा ५६ | महावितरण कंपनी आणि मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लि. (एपीएमएल) यांच्यात झालेल्या १२५ मेगावॉट वीज खरेदी करारास मान्यता मिळविण्यासाठी आणि वीज दराच्या स्वीकृतीकरिता याचिका |
| ५७ | मे. विप्रास कास्टींग्ज् लि. | निरीक्षक अभियंता, पेण सर्कल, महावितरण | ०३.०६.२०१० | २०१० चा ५७ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने दि. ७.४.२०१० रोजी दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याबद्दल महावितरण विरोधात याचिका |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ५८ | श्री नाथु जी. रंभाड | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | २९.०९.२०१० | २०१० चा ५८ | वीज हानीस कारणीभूत ठरणाऱ्या आणि वीज निर्मितीत अडथळा आणणाऱ्या वितरण रोहित्राच्या दुरुस्तीच्या पध्दतीबाबत प्रतिवादीस निर्देश देण्यासाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ५७(१), ८६(१)(आय), १४२ आणि १४३ अंतर्गत याचिका |
| ५९ | टाटा पॉवर कंपनी लि. | मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | २९.०९.२०१० | २०१० चा ५९ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.ने त्यांच्या ग्राहकांना पाठविलेल्या विद्युत देयकाचा उघड उघड गैरवापर करण्याबाबत आणि याचिकाकर्त्याला बदनाम करण्यासाठी देयके तयार करण्याच्या प्रक्रियेचा गैरवापर करण्याबद्दल विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(१)(एफ) अंतर्गत याचिका |
| ६० | मे. रुबी मिल्स लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | ०४.१०.२०१० | २०१० चा ६० | कृतीची मानके विनियमानुसार विहित दाबापेक्षा कमी दाबाने वीज पुरवठा होणाऱ्या ग्राहकांना व्होल्टेज अधिभार लावण्याच्या महावितरण कंपनीच्या प्रस्तावासाठीच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. ७१ मध्ये दि. ५ मार्च २०१० रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ६१ | मे. नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टम्स प्रा. लि. | उल्लेख नाही | ०८.९.२०१० | २०१० चा ६१ | राज्यांतर्गत व्यापार परवान्याच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ सह विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ आणि १५ अंतर्गत याचिका |
| ६२ | मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. | ०४.१०.२०१० | २०१० चा ६२ | विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १४ (२००३ चे ३६) आणि सन २००६ मध्ये सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ खाली मंजूर केलेल्या 'अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडसाठी पारेषण परवाना (परवाना क्र. २००९ चा २)' मध्ये सुधारणा करण्यासाठी अर्ज |
| ६३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | ११.१०.२०१० | २०१० चा ६३ | आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा (मार्ग -१) मध्यम-कालीन तत्वावर २००० (+/-२०%) मेगावॉट वीज प्राप्तीसाठी घेतलेल्या फारकतींना मंजूरी मिळण्यासाठी महावितरण कंपनीची याचिका |
| ६४ | मे. जेएसडब्ल्यु एनर्जी (रत्नागिरी) लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | ०८.१०.२०१० | २०१० चा ६४ | जेएसडब्ल्यु एनर्जी (रत्नागिरी) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्यामध्ये उद्भवलेल्या वादाच्या अभिनिर्णयासाठी याचिका |
| ६५ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | ०८.०९.२०१० | २०१० चा ६५ | जळगाव, नांदेड आणि बारामती येथे नव्याने निर्माण करण्यात आलेल्या परिमंडलात ग्राहक गाऱ्हाणे मंच स्थापन करण्यातून सूट मागण्यासाठी याचिका |
| ६६ | मे. अभिनंदन एन्टरप्रायजेस | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | १३.०५.२०१० | २०१० चा ६६ | विद्युत लोकपाल यांनी सन २०१० चे अभिवेदन क्र. २६ मध्ये दि. ३० मार्च २०१० रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याप्रकरणी याचिका |
| ६७ | मुळा प्रवरा सहकारी विद्युत सोसायटी लि. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | १३.१०.२०१० | २०१० चा ६७ | सन २००८ च्या प्रकरण क्र. ७७ आणि ७८ मधील निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक २८ नोव्हेंबर,२०१० च्या आदेशाच्या संदर्भात भार नियमन कार्यपध्दतीचे पालन करण्यासाठी प्रतिवादीला निर्देश देण्याची मागणी करणारी आणि प्रतिवादीने त्यांच्या दिनांक ०६/१०/२०१० च्या आदेशाने निर्गमित केलेले भार नियमनाचे वेळापत्रक रद्द करण्यासंबंधी याचिका |
| ६८ | मे. इस्पात इंडस्ट्रीज लि. | (१) महावितरण कं.,<br>(२) महापारेषण,<br>(३) इंडियन एनर्जी एक्स्चेंज लि., .<br>आणि (४) पॉवर एक्स्चेंज इंडिया लि | २०.१०.२०१० | २०१० चा ६८ | विद्युत अधिनियम, २००३, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ अंतर्गत मुक्त प्रवशासाठी अर्ज आणि वितरण मुक्त प्रवेशासाठी कार्यपध्दती |
| ६९ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | १५.१०.२०१० | २०१० चा ६९ | आर्थिक वर्ष २००८-०९ साठी अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० साठी वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ साठी एकूण महसुली गरज आणि वीज दराच्या निश्चितीकरणासाठी, |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सन २००९ च्या प्रकरण क्र. १११ मधील दि. १२ सप्टेंबर, २०१० च्या आदेशाच्या पुनर्विलोकनासठी याचिका |
| ७० | उल्हासनगर मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | २०.१०.२०१० | २०१० चा ७० | लघु दाब ५ : लघु दाब-उद्योग (बी) वर्गवारीच्या वीज दरासाठीच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. १११ मध्ये दि. १२.९.२०१० रोजीच्या महावितरण कंपनीच्या वीज दराच्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ७१ | टाटा पॉवर कंपनी लि. (निर्मिती) | उल्लेख नाही | १५.१०.२०१० | २०१० चा ७१ | टाटा पॉवरच्या निर्मिती व्यवसायाची आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० साठी वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ साठी एकूण महसुली गरज यांच्या मंजुरीच्या संबंधात आयोगाने दि. ८ सप्टेबर २०१० रोजी दिलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका (२००९ चे प्रकरण क्र. ९६) |
